


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १६७ * नांदेड * सोमवार, दि. २३ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# अमेरिकेचा इराणच्या तीन अणुकेंद्रांवर हल्ला

## युद्ध तुम्ही सुरु केलंय, शेवट आम्ही करु; इराणचा इशारा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिकन लष्कराने शनिवारी रात्री बी–२ स्टील्थ बॉम्बर विमानांचा वापर करुन इराणमधील तीन अणुस्थळांवर हल्ला केला. इराणच्या फोर्डो, नातांझ, एसफहान या तीन आण्विक तळांवर अमेरिकेने हल्ले केले. हे तिन्ही आण्विक तळ इराणच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. हे आण्विक तळ जमिनीच्या आतमध्ये असल्याने अमेरिकेच्या लढाऊ विमानांनी याठिकाणी मासिव्ह ऑर्डिनेस एअर ब्लास्ट श्रेणीत मोडणारे जीबीयू–५७ए/बी बाँब टाकले. या बाँबमध्ये जमिनीच्या आतमध्ये खोलवर संहार करण्याची क्षमता असते. त्यामुळे अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचे तिन्ही आण्विक तळ उद्धवस्त झाले आहेत. यानंतर इराण प्रचंड संतापला आहे. इराणने त्यांच्या सरकारी वृत्तवाहिनीवरुन अमेरिकेला इशारा दिला आहे. 'युद्ध तुम्ही सुरु केलं आहे, शेवट आम्ही करु. आता प्रत्येक अमेरिकन आणि त्यांचा जवान आमचं लक्ष्य असेल', अशी धमकी इराणने दिली आहे. अमेरिकेला आता अभूतपूर्व



प्रत्युत्तर मिळेल. अमेरिकेचं आजपर्यंत कधी झालं नाही असं नुकसान होईल, असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांनी दिला आहे. त्यामुळे आता मध्यपूर्वेत युद्धाचा भडका उडण्याची शक्यता आहे. या सगळ्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि भारतावर विपरीत पडसाद होण्याची दाट शक्यता आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी पहाटे इराणच्या तीन आण्विक तळांवर अमेरिकन लष्कराने हवाई हल्ले केल्याची माहिती दिली. या हल्ल्यानंतर इराण युद्ध थांबवेल आणि शांतता प्रस्थापित करेल, अशी अपेक्षाही ट्रम्प यांनी व्यक्त केली होती. यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकेला संबोधित केले होते. यावेळी ट्रम्प यांनी अमेरिकन सैन्याच्या कामगिरीचे कौतूक केले. अमेरिकी हवाई दलाने अत्यंत अचूकरित्या आणि वेगाने हल्ला केला. अमेरिकन लष्कराने केलेल्या या कामगिरीच्या आसपासही जगातील कोणतेही सैन्य जाऊ शकत नाही. आता अमेरिकन लष्कराला पुन्हा इतक्या मोठ्या क्षमतेचा हल्ला करण्याची वेळ येणार नाही, अशी आशा मी करतो. मात्र, शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणखी काही वेळ लागेल, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले.

गेल्या आठ दिवसांपासून इराण आणि इस्रायल यांचे युद्ध सुरु आहे. इस्रायली लष्कराकडून सातत्याने इराणी अणुशास्त्रज्ञ आणि इराणी लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मारले जात आहे. या पार्श्वभूमीवर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांनी मोठा निर्णय घेतला आहे. इस्रायलकडून अयातुल्ला खामेनी यांची हत्या करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे खामेनी यांनी त्यांना काही झाल्यास आपले तीन उत्तराधिकारी निवडले आहेत.

## पहलगाम अतिरेकी हल्ला प्रकरणी दोघांना अटक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे धर्म विचारुन २६ नागरिकांची हत्या केली होती. या अतिरेकी हल्ला प्रकरणी एनआयएने पहलगाम येथे राहणाऱ्या दोन जणांना अटक केली आहे. अतिरेक्यांना आश्रय दिल्याचा आरोप ठेवून दोघांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्यांची नावं अनुक्रमे परवेझ अहमद जोथर आणि बशीर अहमद जोथर अशी आहेत.

अतिरेकी हल्ला करणाऱ्यांपैकी तीन जणांची ओळख पटली आहे. बंदी असलेल्या लष्कर – ए – तोयबा या अतिरेकी संघटनेशी संबंधित असलेल्या या अतिरेक्यांचा शोध सुरू आहे. हल्लेखोर अतिरेकी पाकिस्तानचे नागरिक होते. परवेझ आणि बशीर या दोघांनी अतिरेक्यांच्या राहण्याची तसेच त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली होती. हल्ला करण्याआधी अतिरेकी हिल पार्क येथील एका घरात वास्तव्यास होते.

# शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्यासाठी युद्ध थांबवा

## पंतप्रधान मोदी आणि इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी फोनवरुन केली चर्चा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या लढाईत अमेरिका आणि येमेनमधील हुती अतिरेकी संघटना यांनी एकाच दिवशी उडी घेतली आहे. यामुळे युद्ध विस्तारण्याचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यात फोनवरुन चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी सध्याच्या परस्थितीबाबत चर्चा केली. लष्करी संघर्षाबाबत पंतप्रधान मोदींनी चिंता व्यक्त केली. तणाव त्वरेने कमी करण्यासाठी संवाद हाच उत्तम पर्याय असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. प्रादेशिक शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्यासाठी लष्करी संघर्ष थांबणे आवश्यक असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदींनी केलेल्या आवाहनाला इराण कसा प्रतिसाद देणार याकडे अनेकांचे लक्ष आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यात फोनवरुन ४५ मिनिटे चर्चा झाली. दोन्ही देशांनी एकमेकांमधील



दृढ करण्याची परस्परांना हमी दिली. भारत हा प्रादेशिक शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्यासाठी काम करणारा देश असल्याचे इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान म्हणाले. तणाव करण्यासाठी भारताने सुचविलेल्या सल्ल्यांवर इराण गंभीरपणे विचार करेल, असे इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान म्हणाले. त्यांनी तणावाच्या काळातही इराण सोबत राहिल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे आभार मानले. प्रादेशिक शांतता आणि स्थैर्यासाठी भारताची साथ महत्त्वाची असल्याचे ते म्हणाले.

इस्रायल आणि इराण यांच्यात दहा दिवसांपासून लढाई सुरू आहे. अमेरिकेने इराणमध्ये निवडक ठिकाणी बॉम्ब टाकले. इराणची आण्विक शक्ती नष्ट करण्यासाठी ही कारवाई केल्याचे सांगत अमेरिकेने इस्रायलच्या इराण विरोधी कारवाईला पाठिंबा जाहीर केला. आवश्यकता भासल्यास इराण विरोधात आणखी कठोर कारवाई करू, असेही अमेरिकेने जाहीर केले. तर अमेरिका इराणवर हल्ला करणार असेल तर आम्ही अमेरिकेला धडा शिकवू, असा धमकीवजा इशारा येमेनेमधील हुती अतिरेकी संघटनेने दिला आहे.

इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या लढाईत अमेरिका इस्रायलच्या बाजूने उभी आहे. पण अमेरिकेने केलेला हल्ला आणि त्यांचा इस्रायलला असलेला पाठिंबा म्हणजे इराण विरोधातील कारवाईच असल्याचे इराण सरकारने जाहीर केले. इस्रायलने १३ जून २०२५ रोजी आण्विक शक्ती नष्ट करण्याच्या उद्देशाने इराणवर हवाई हल्ले सुरू केले. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने वेगवेगळ्या उंचीवरुन उडणाऱ्या क्षेपणास्त्रांचा वापर करुन इस्रायलच्या हवाई संरक्षण यंत्रणेला चकवून हल्ले सुरू केले आहेत.

# जिल्ह्यात तीन आगीच्या घटना; नांदेड शहरात पुठ्ठ्याच्या गोडाऊनला आग



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर व जिल्ह्यात तीन आगीच्या घटना घडल्या असून त्यातील एका घटनेत नांदेड शहरातील एका गोडाऊनला आग लागली होती. अग्निशामन दलाच्या बंबांनी या तिन्ही आगीवर नियंत्रण मिळविले असून यात कुठलीही जीवितहानी झाली नाही.

शहराच्या शांतीनगर माळटेकडी येथे प्लास्टिक, पुठ्ठा गोडाऊन व टीनशेडच्या रुमांना आग लागली होती. काही वेळात येथे अग्नीशमन दलाच्या बंबांनी येऊन आग आटोक्यात आणली. या आगीच्या घटनेत प्लास्टिक पुठ्ठा गोडाऊन व त्या शेजारील टीनशेडच्या रूमांना आग लागली होती. सदरील आगीमध्ये कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही व निवासी घरांना आगीपासून वाचवण्यात अग्निशमन दलाला यश आले.

तसेच दि. २२ जून रोजी पहाटे तीन वाजता आनंदनगर, शारदानगर येथे लाँड्री दुकानाला आग लागली होती. येथे अग्नीशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी वेळेच पोहचून आग आटोक्यात आणली. या आगीमध्ये साड्या, कपडे, वायरिंग, सिलींगचे नुकसान झाल्याचे सांगण्यातआले.

तर तिसऱ्या घटनेत दि. २२ जून रोजी सकाळी ११ वाजता नारायणा (पान ६ वर...)

# शिवसेना ठाकरे गटाचे नांदेड जिल्ह्यातील पदाधिकारी जाहीर

## महानगरप्रमुखपदी प्रकाश मारावार, नांदेड उत्तर शहरप्रमुखपदी आनंद जाधव तर नांदेड दक्षिण महानगरप्रमुखपदी मनोज यादव यांची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेना ठाकरे गट पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून नांदेड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये प्रकाश मारावार यांची महानगरप्रमुख तर सुनील कदम यांची नांदेड उत्तर तालुकाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

यासह देगलूर, नायगाव, किनवट सहसंपर्कप्रमुख दयाल गिरी, मुखेड, लोहा, भोकर भागवत जाधव, नांदेड उत्तर, भोकर, मुखेड जिल्हा संघटकपदी नरहरी वाघ, नांदेड दक्षिण, लोहा, देगलूर अविनाश तरोडेकर, किनवट, हदगाव सुभाष मनुलेकर, जिल्हा समन्वयक भाऊसाहेब कदम, उपजिल्हाप्रमुख दिगंबर वाळकीकर, उमेश जाधव, सतीश पाटील उमरेकर, नांदेड दक्षिण शहर महानगरप्रमुख मनोज यादव, महानगर संघटक नवज्योतसिंग गाडीवाले, शहरप्रमुख नांदेड उत्तर आनंद जाधव, विधानसभा प्रमुख राजेश लंगडापुरे, अनिल रुणवाल, विजय कल्याणकर, हनुमंत भवर, वसंत मंगरूळकर, नरेंद्र जेठेवार, पांडुरंग थडके, शरद कोडगिरे, उपजिल्हा संघटक सुरेश हिलाल, माधव पांचाळ, बालाजी कल्याणकर, गजानन हरकरे, धुराजी नावंदे, तालुका समन्वयक दादाराव शिंदे, बसवंत वन्नाळीकर, रमेश देशमुख, प्रभाजी जाधव, हरिभाऊ धुमाळ, विजय मंगलगे, गणेश भोसले, माहूर शहर प्रमुख बालाजी वाघमारे नायगाव गजानन तंदुरे, धर्माबाद बालाजी बनसोडे, हदगाव राहुल भोळे, हिमायतनगर प्रकाश राम दिनवार, किनवट प्रशांत कोरडे, मुदखेड उत्तर शहर अविनाश झमकडे, मुदखेड दक्षिण शहर साहेबराव चव्हाण, लोहा खंडू पवार, कंधार अतुल पापीनवार, देगलूर शहर संजय जोशी, देगलूर पूर्व रवी उल्लेवार, कुंडलवाडी विठ्ठल हेमके धर्माबाद शहर संघटक राजू श्रीरामाने, नांदेड उत्तर बालाजी सुनपे, बाळू चंद्रे, नांदेड दक्षिण शहर गौतम जैन, भगवान जाधव, दिगंबर लाडे, सुनील नाकशेट्टीवार, कृष्णा काळेवार, बिच्चू स्वामी, बालाजी देशमुख, मनोज काकडे, गणेश शहाणे, सय्यद रहीम, विभाग प्रमुख अक्षय रत्नपारखे, एकनाथ मोगरकर, उपजिल्हा संघटक रामचंद्र रेड्डी, विठ्ठल ठाकरे, व्यंकटेश बाराटे, शिवराज मोकलीकर, सतीश देशमुख, तुकाराम पांचाळ, तालुकाप्रमुख मारुती पाटील, नांदेड उत्तर तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम मरळककर, उमेश पाटील, भीमराव शिंदे, नांदेड उत्तर तालुका संघटक नवनाथ पाटील जोगदंड निळेकर (पान ६ वर...)

# मसाप शाखा नांदेडची नूतन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी बालाजी इबितदार तर प्रा. महेश मोरे कार्यवाह

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा साहित्य परिषदेचे नूतन कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली. अध्यक्षपदी बालाजी इबितदार, उपाध्यक्षपदी दिगंबर कदम, श्रीनिवास मस्के यांची तर कार्यवाह पदी प्रा. महेश मोरे यांची निवड करण्यात आली आहे.



नांदेड येथील नानानानी पार्कमधील स्व. सुधाकरराव डोईफोडे ज्येष्ठ नागरिक सभागृहात मराठवाडा साहित्य परिषदेच्या २०२५ ते २०३० पर्यंतच्या कार्यकारिणीची निवडणूक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध पार पडली. निवडणूक अधिकारी म्हणून डॉ. जगदीश कदम तर निवडणूक निरीक्षक म्हणून संजीव कुलकर्णी आणि देवीदास फुलारी यांनी काम पाहिले.

प्रारंभी दिवंगत साहित्यिक मारुती चितमपल्ली आणि नरेंद्र नाईक यांना आदरांजली वाहण्यात आली. नंतर देवीदास फुलारी यांनी मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने निवडणुकी संदर्भात प्रस्ताविक केले. शाखेचे मावळते अध्यक्ष प्रभाकर कानडखेडकर यांनी आजपर्यंतचा शाखेच्या कार्याचा आढावा घेतला. तद्नंतर डॉ. जगदीश कदम यांनी निवडणुकीची रितसर प्रक्रिया पार पाडली. ही निवडणुक सर्वानुमते बिनविरोध पार पडली. नूतन कार्यकारिणीत अध्यक्ष बालाजी इबितदार, उपाध्यक्ष दिगंबर कदम, श्रीनिवास मस्के, कार्यवाह महेश मोरे, सहकार्यवाह राम तरटे, कोषाध्यक्ष व्यंकटेश चौधरी यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून योगिनी पांडे सातारकर, ललिता शिंदे–बोकारे, शेख निजाम गवंडगावकर, अनुजा शंतनु डोईफोडे, धाराशिव शिराळे, व्यंकटेश काटकर आणि संजय जगताप यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर नूतन अध्यक्ष बालाजी इबीतदार यांनी आपल्या मनोगतात शाखेची देदीप्यमान परंपरा कायम ठेवत आम्ही काम करू अशी ग्वाही दिली. नूतन सहकार्यवाह राम तरटे यांनी आभार मानले. यावेळी प्रामुख्याने शंतनू डोईफोडे, बापू दासरी, भगवान अंजनीकर, माधव चुकेवाड, निर्मलकुमार सूर्यवंशी, कुलदीप नंदुरकर, देवीदास तारु शिवा कांबळे, मारुती मुंडे, लक्ष्मी पुरणशेटीवार यांच्यासह साहित्य परिषदेचे आजीव सभासद मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. दरम्यान मराठवाडा साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा निवडणूक अधिकारी डॉ. जगदीश कदम, निवडणूक निरीक्षक संजीव कुलकर्णी आणि देविदास फुलारी यांनी नवनिर्वाचित कार्यकारणीचे अभिनंदन करून पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या.

## माजी मुख्यमंत्र्यांच्या कारखाली चिरडून एकाचा मृत्यू

**हैदराबाद (प्रतिनिधी)–** आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि वायएसआर काँग्रेसचे प्रमुख जगनमोहन रेड्डी यांच्या स्वागतला आलेल्या गर्दीत एका ७० वर्षीय वृद्धाचा कारखाली चिरडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. जगनमोहन रेड्डी शनिवारी सत्तेनपल्ली येथे एका कार्यक्रमासाठी आले असता, त्यांच्या स्वागताला कार्यकर्त्यांनी व चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी, त्यांच्या कारच्या ताफ्यासमोरच कार्यकर्त्यांनी धाव घेतल्याने सुरक्षा यंत्रणेला देखील ही गर्दी नियंत्रित करता आली नाही.



**नांदेड** : दि. नांदेड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत महारूद्र विकास पॅनल जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे १५ पैकी ९ उमेदवार विजयी होऊन स्पष्ट बहुमत मिळविले. विजयी उमेदवारासह पॅनलचे सर्व पदाधिकारी व समर्थकांनी फटाके फोडून व गुलाल उधळून जल्लोष साजरा केला. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)




## प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जावरकर यांनी संपवलं जीवन

**मुंबई (प्रतिनिधी)–** प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रशांत जावरकर यांनी विषारी इंजेक्शन टोचून आत्महत्या केली आहे. न्यू तापडिया नगरमधील त्यांच्या राहत्या घरी त्यांनी हे टोकाचं पाऊल उचलल्याचं समजतं आहे.

डॉ. जावरकर हे अकोल्यातील ख्यातनाम मानसोपचार तज्ज्ञ डॉ. दीपक केळकर यांच्या 'सन्मित्र हॉस्पिटल'मध्ये अनेक वर्षांपासून कार्यरत होते. तणाव, नैराश्य आणि मानसिक आजारांनी त्रस्त रुग्णांना समुपदेशन करून मदत करणाऱ्या डॉक्टरांनी स्वतःच जीव संपवल्याची घटना सुन्न करणारी ठरली आहे. या घटनेमुळे संपूर्ण अकोला शहरातील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. नेहमी सकारात्मक विचार मांडणारे, पेशंटच्या समस्या समजून घेऊन त्यांना मानसिक आधार देणारे डॉ. जावरकर स्वतःच इतक्या मोठ्या तणावाखाली होते का, हा प्रश्न आता उपस्थित होतोय. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्येचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. विषारी इंजेक्शन टोचून त्यांनी आत्महत्या केल्याचं प्राथमिक तपासात निष्पन्न झालं आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे. समुपदेशन करणाऱ्या डॉक्टरनेच आत्महत्येचा निर्णय घेतल्यामुळे ही घटना आणखी धक्कादायक समजली जात आहे.

# आ.चिखलीकरांनी घेतली जरांगे पाटील यांची भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष करणारे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांची लोहा–कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी रविवार, दि. २२ जून रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे जाऊन भेट घेतली.

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या समवेत झालेल्या चर्चेदरम्यान मी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाजा सोबत असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आ.चिखलीकर यांच्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर, भानुदास पवार यांची उपस्थिती होती.

## तिसऱ्या दिवशी इंग्लंडचा डाव ४६५ धावांवर आटोपला

**लीड्स (वृत्तसंस्था)–** भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या लीड्स कसोटीचा तिसरा दिवस भारताच्या नावावर राहिला. पहिल्यांदा टीम इंडियाच्या गोलंदाजांनी इंग्लंडचा पहिला डाव ४६५ धावांवर रोखला आणि ६ धावांनी आघाडी घेतली. यानंतर भारताने तिसऱ्या दिवशी २ बाद ९० धावा केल्या आहेत. यशस्वी जायसवाल ४ आणि साई सुदर्शन ३० धावा करून बाद झाले.

भारतीय संघाने शुभमन गिल, ऋषभ पंत आणि यशस्वी जायसवाल यांच्या शतकांच्या मदतीने पहिल्या डावात ४७१ धावा केल्या होत्या. याचे प्रत्युत्तर देण्यासाठी उतरलेल्या इंग्लंडचा पहिला डाव ४६५ धावांवर आटोपला.

पहिल्या डावातील ६ धावांच्या आघाडीनंतर केएल राहुल आणि यशस्वीची जोडी मैदानावर पोहोचली. मात्र टीम इंडियाच्या दुसऱ्या डावाची सुरूवात चांगली राहिली नाही. १६ धावांवर भारताला पहिला झटका बसला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील


# संरक्षण खरेदीत सुधारणा आवश्यक

भारतासमोर सध्या असंख्य सुरक्षाविषयक आव्हाने उभी ठाकलेली असताना संरक्षण खरेदी प्रक्रियेतील गंभीर त्रुटींचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणी-वर आला आहे. नुकतेच एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी या मुद्द्यावर स्पष्टपणे चिंता व्यक्त करत संरक्षण मंत्रालयाच्या खरेदी धोरणावर कठोर भाष्य केले आहे. त्यांच्या मते, एकही संरक्षण खरेदी प्रकल्प वेळेत पूर्ण झालेला नाही. या विधानामुळे केवळ या यंत्रणेतील ढिसाळपणाच नव्हे, तर देशाच्या युद्ध तयारीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा इशारा वेळेत मिळालेला असूनही याआधी अनेक वेळा दुर्लक्षित करण्यात आला. आज जिथे चीन-पाकिस्तान यांच्यातील सखोल लष्करी सहकार्य भारतासाठी गंभीर धोका निर्माण करत आहे, तिथे आपल्या लष्कराच्या आधुनिकीकरणात होणाऱ्या विलंबाची किंमत आपल्याला मोठ्या नुकसानाच्या रूपाने मोजावी लागू शकते. सध्याची संरक्षण खरेदी प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आणि वेळखाऊ आहे. प्रस्तावना, निविदा, मंजुरी आणि वितरण या सर्व टप्प्यांमध्ये अनावश्यक विलंब होतो. संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि माजी लष्करी अधिकारी वारंवार या प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणी करत आहेत. २०२० मध्ये अंतिम रूप दिलेले 'डिफेन्स अक्विझिशन प्रोसिजर' हे धोरण आजही अनेक बाबतींत अप्रस्तुत आणि कालबाह्य ठरत असल्याचे सांगण्यात येते. संरक्षण मंत्रालयाने २०२५ हे वर्ष 'सुधारणांचे वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी निर्णायक आणि धाडसी पावले उचलणे आवश्यक आहे. भारताची अर्थव्यवस्था आज जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून गणली जाते. अशा देशात केवळ 'संसाधनांची कमतरता' हे उशिराचे कारण मान्य करता येणार नाही. संरक्षण बजेट हे देशाच्या सकल उत्पन्नाच्या फक्त १.९ टक्के इतके असले तरी त्याचा पूर्ण उपयोग होत नाही, हे आणखी एक चिंतेचे कारण आहे. यामागील कारण म्हणजे देशांतर्गत उत्पादन व विकास क्षमता पुरेशी विकसित झालेली नसणे. त्यामुळे केवळ परकीय कंपन्यांवर अवलंबून राहण्याची वेळ भारता-वर येते. या सर्व परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी आणि प्रगती साधण्यासाठी संरक्षण खरेदीत कार्यक्षमतेचा व पारदर्शकतेचा नवा अध्याय सुरू करावा लागेल. केवळ युद्धासाठी सज्ज असण्याचे नव्हे, तर युद्ध रोखण्यासाठी शक्तिशाली लष्कराची आवश्यकता असते. एकदा एखादा शस्त्रसंच मागवला, तर तो प्रत्यक्षात उपलब्ध होईपर्यंत त्याची तांत्रिक उपयुक्तता मागे पडते. परिणामी, लष्कराला कालबाह्य तंत्रज्ञानावरच अवलंबून राहावे लागते. 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये भारतीय लष्कराच्या कामगिरीची प्रशंसा करत असतानाही, एअर चीफ मार्शल सिंग यांनी हा खरा धोका अधोरेखित केला की, आपण कालबाह्य शस्त्रास्त्रे घेऊन युद्धभूमीवर गेलो असतो, तर त्याचे परिणाम वेगळे असू शकले असते. यामुळे आता संरक्षण खरेदी धोरणाकडे केवळ कागदी सुधारणा नव्हे तर ठोस अमलबजावणीच्या दृष्टीने पाहिले जावे. यासाठी योग्य उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे. सर्व प्रकल्पांना ठरावीक कालावधी ठरवून देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी केली गेली पाहिजे. जुनी व कालबाह्य मानसिकता असलेल्या समित्यां-ऐवजी तरुण, तंत्रनिष्ठ व अनुभवी अधिकाऱ्यांचा समावेश केला गेला पाहिजे. सरकार बदलल्यावर धोरणे बदलू नयेत यासाठी दीर्घकालीन राष्ट्रीय संरक्षण आराखडा तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या घडीला भारतासमोर असलेली लष्करी आव्हाने केवळ सीमा पारची नाहीत, तर सायबर सुरक्षा, अंतराळ क्षेत्र, जलवाहतुकीचे मार्ग, आणि अंतर्गत दहशतवाद अशा अनेक पातळ्यांवर आहेत. अशा वेळी सशक्त, सुसज्ज आणि तत्पर लष्कर हा केवळ अभिमानाचा विषय नाही, तर राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक आहे.

# लहानपण देगा देवा, नको कुणाचा हेवा-देवा!

लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा. संत तुकाराम ांच्या ह्या ओळींची आठवण झाली की, मन परत एकदा लहानपणात जाऊन बागडायला लागतं. खरंच किती अजाण वय असते ते? लहान लेकराला, जाणिवेच्या पलीकडील आनंदाचा अनुभव घेता येतो व त्याचं जग; मोह, माया, अहंकार, द्वेष, तिरस्कार, वाद, जात, धर्म, कुठल्याच भेदाला बळी पडणार नसते.

लहान मुले ही देवाघरची फुले असतात, असे म्हणतात. ते काही उगीच नाही. किती सुंदर, शुद्ध, निष्पाप जीव असतो लहान. त्याला गरीब-श्रीमंत, लहान, मोठा, उच्च-नीच काही नाही समजत. किती प्रेमाचं प्रतीक आहे ते? लहानपण हे असे चुंबक आहे, ज्यास चिकटूनच राहावे वाटते. माणसाच्या मनाच्या तळाशी बालपण नेहमी वास्तव्यास असते. खालील ओळींमध्ये म्हटल्याप्रमाणे,

लहान लेकराचे असते निर्विकार जग
लहानपण देते जगण्याला झगमग

लहान लेकरू ज्ञानेश्वरांचे, हे विश्वची माझे घर, ही वृत्ती जोपासणारं प्रतीक आहे. ही लेकरे, जातीपातीच्या भिंती पाडून सर्वांसोबत सारखीच राहतात. लहान मुले, श्रीकृष्णासारखे, आपल्या सवंगड्यावर प्रेम करण्याचे प्रतीक असतात. जिथे सुदामासारखी अनेक गरीब मित्र सुद्धा, त्याला गरीब वाटत नाहीत. मग आम्ही आजचे मोठे म्हणवून घेणारे, गरीब-श्रीमंत ही दरी का बरं बाळगत असतो? कारण आम्ही मोठे झाल्यावर लहानपण जगत नाही. लहान मुले येशूसारखे संदेश वाहक असून, देवाने त्यांच्या माध्यमातून समाजात प्रेमाचा संदेश दिला आहे. पण आमचे, मोठ्यांचे, पाषाणरुपी हृदय ही बाब समजू शकत नाही. आज मोठ्या माणसांना, समाजात वाढत चाललेल्या प्रेमाच्या, संवेदनशीलतेच्या, भावनेच्या अंधारात, प्रकाश आणण्यासाठी, लहान लेकरांच्या प्रेमळ, निर्विकार, निर्मोही व निरपेक्ष दिव्याचा वापर करावा लागेल. खरंच ही एक चिंतनीय बाब असून, लहान असताना शाळेत अभ्यासक्रमातून संतांचे नम्र जीवन शिकवले होते. समाजसुधारकांची समाजासाठी जगण्याची वृत्ती शिकवली होती, मग पुढे मोठे झाल्यावर हीच बालपणाची निःस्वार्थ वृत्ती व धडे आपण जीवनाच्या प्रवासात वापरली असती, तर आजचे जग याहून जास्त प्रेमळ व निर्विकार असते व यावर चिंतन करण्याची गरज आज निर्माण झाली नसती, कारण बालपणी शिकलेल्या सगळ्या गोष्टी व धडे, आपणांस पुढे मोठे झाल्यावर जीवनात आचरणात आणायच्या होत्या पण. आजचा भौतिक माणूस, केवळ धनाने समृद्ध बनत असून, तो मनाने मात्र अस्वस्थ व बेचैन असलेला दिसून येतो. त्याचे कारण, मोठ्या माणसाच्या मनात असलेले नाना विकार असून, त्याचा गर्व व लोभ, त्याच्या सुखी जीवना आड येतो. म्हणून मोठ्या माणसाला बालपण जरी परत नाही मिळवता आले, तरी निर्विकार बालपण मात्र नक्कीच जगता येईल. खरंच बालपणीचे जीवन, अतिशय सुखी व आनंदी असलेले दिसते. त्याही पुढे जाऊन सांगता येईल. खऱ्या अर्थाने जीवनातील प्रत्येक क्षणाचा आनंद लहान लेकरे घेत असतात. कारण लहान लेकरांच्या विश्वात, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा या सर्व गोष्टी आढळून येतात. अंतर्मनाने अतिशय निर्मळ असलेली ही लहान लेकरे, या धर्तीवरील स्वर्ग निर्मितीचे प्रतिनिधित्व करतात, त्यांची निस्वार्थी वृत्ती



मोठ्यांनी जर अंगीकारली तर निश्चितच, हे विश्व, जीवन जगण्यास आदर्श वाटेल. आपण जीवन जगताना, बालपण जोपासले, लहानपण जगले तर मात्र अहंकार, गर्व, मोठेपणा, स्वार्थ, हेवा, मत्सर या मनुष्य जीवनाच्या सुखाला घातक असलेल्या बाबी, नष्ट करता येतील व आपले जीवन आनंदमय होईल व त्यात निरंतर प्रगती करता येईल. खाली सांगितल्याप्रमाणे,

पेरूनी लहाणपणाच बीज
करता येते जीवनाचे चीज
आचरूनी लहानपणीचे धडे
मोडता यतील अहंकाराचे कडे.

खरंच आपण मोठे झाल्यावर ,जगण्यात बालपण व बालपणाची वृत्ती पेरत गेलो तर नक्कीच, आदर्श जीवनाचे पीक निर्माण होईल. बालपणीचे सर्व धडे जर आपण अंगीकारले, तर अहंकाराचे कडे आपणास मोडता येत असतात. तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे, महापुरे झाडे जाती तिथे लव्हाळे राहाती खरंच महापूर आल्यावर, ताठ उभी असलेली झाडे गळून पडतात व वाहून जातात, पण त्याच महापुरात लव्हाळे मात्र नम्रपणे वाकून तग धरून राहतात.म्हणून आपण कितीही मोठे झालो तरी लहानपण व नम्र वृत्ती बाळगून जीवनात कुठल्याही स्थितीत तग धरून राहता येते. जे काम अहंकाराने बिगडते तेच काम नम्रपणाची वृत्ती बाळगून पूर्ण करता येते. अहंकाराच्या भ्रमिष्ट बेडीत अडकलेल्या आजच्या माणसाचं जीवन, दुःखी होऊन तो जीवनाचा आस्वाद घेऊ शकत नाही. रावणाचा अहंकार, त्याचा पराभव करतो, तर त्याचा भाऊ, बिभीषण, केवळ प्रेम व नम्र वृत्तीने प्रभ रामचंद्राच्या, मनात आपले घर करतो. यावरून लक्षात येते की, प्रेमळ व नम्र वृत्ती जी माणसाला अहंकारी बनू देत नाही, त्याला लहानच ठेवते ती जीवनाचा स्वर्ग बनवते.

संत, समाजसुधारक, विचारवंत व कुणीही मोठी माणसे यांनी लहान लेकराची प्रेमळ, संवेदनशील वृत्ती बाळगून त्यांचे जीवन जगले व समाजाला प्रेमाचा संदेश दिला. म्हणून...संत होते निर्विकार, नव्हता त्यांच्या ठाई अहंकार' जगले दीप होऊन' राहिले लहानपण घेऊन' परंतु, आज मानव हा दानव बनला आहे की काय? असे वाटायला लागले आहे. भावनाशून्य व्यवहार, अन्याय, अत्याचार, स्वार्थी वृत्ती या वाईट गोष्टींची सत्ता आजच्या माणसाच्या जीवनावर निर्विवादपणे आपले राज्य करताना दिसून येत आहे, तिथे प्रेमाचा लवलेश दिसत नाही. नाते ही आज, व्यवहाराचा तराजू वापरूनच तोलली जातात. आज स्वला मोठा म्हणून घेणारा माणूस मात्र मोठेपणाचा टेंभा मिरवत राहतो व जीवनात दुःख ओढून घेत असतो. मग, या अशा वैचारिक अंधारात, प्रेमाच्या दुष्काळात, एकमेकांमध्ये प्रेम रुजविण्यासाठी,

ज्योत से ज्योत
जगाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो

असे म्हटल्याप्रमाणे, लहान लेकरे एकमेकांना प्रेम वाटतात तद्वतच, लहान लेकरांच्या प्रेमरुपी जहाजात बसून, मोठ्या माणसांनी सुद्धा जीवनरुपी किनारा त्यांच्या प्रमाणे पार करण्याचा प्रयत्न केला, तर मात्र धरतीवरच प्रेमाचा, आपुलकीचा स्वर्ग निर्माण करता येणे शक्य होईल. त्यासाठी गरज आहे ती मोठ्यांनी लहानपण घेण्याची, लहानपण घेऊन एकमेकांना प्रेम वाटण्याची, सुख दुःखात सहभागी होण्याची..अगदी लहान मुलासारखे निष्पाप मन वापरून, जीवनाची वाट चालत राहिले व मार्गावरील प्रवाश्यांना तितक्याच निष्पाप भावनेने सोबत घेऊन पुढे गेले तर माणसाज्ञ.-माणसातील माणुसकी निर्मितीच्या प्रक्रियेला गती प्राप्त होईल. मोठ्यांनी आपल्या व इतरांच्या मनात लहानपण पेरत गेले तर पुढेही तेच पीक निर्माण होईल. सोबतच, मोठ्या माणसांनी काही बाबतीत (नात्यांच्या) जर लहान मुलांच्या नजरेतून पाहिले, तर जगातील अनेक समस्या सुटू शकतील. अनेक बाबतीत लहान मुलांचे मन वापरून, व्यवहार केल्यावर, त्यातून प्रेम उत्पन्न होऊ शकते. लहान लेकरे खेळताना किती तल्लीन होऊन निस्वार्थ भावनेने सगळ देहभान विसरून खेळतात, त्याच पद्धतीने नात्यांचे खेळ, मोठ्यांनी, निःस्वार्थ वृत्तीने खेळले तर नात्यात पडलेली दरी मिटवायला मदत होईल व भविष्यात आदर्श नात्यांची वीण अधिक घट्ट होईल.

लहान मुले यासाठी कारणीभूत असतात का? मोठे म्हणून घेणारे आम्ही खरंच माणूस म्हणून मोठे आहोत का? तर नाही. आपले (मोठ्यांचे) जग अनेक विकारांनी भरले असून ते अपूर्ण आहे, तर लहान लेकरांच्या जगात, पदोपदी प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, अनुभवायला मिळतो. लहान मुलांना मोठे होताना, त्यांच्यावर संस्कार कसे केले जातात यावरून स्पष्ट होते की तो पुढे चालून काय होणार. संस्कार, हेच त्या मुलाला भविष्यात आदर्श माणूस बनवू शकतात. त्यामुळे आपण सर्वांनी म्हणजे मोठ्यांनी, ही आपली नैतिक जबाबदारी समजून व या समाजाला पुढे नेण्यासाठी चांगली माणसे दिली तर निश्चितच एक वेगळी वाट तयार होईल.

प्रत्येक मोठ्या यशवंत, कीर्तिवंत माणसाने लहानपण जोपासून, आपले जीवन नम्रपणे जगून, त्यांच्या नंतरच्या पिढीसाठी नम्र जीवनाचा आदर्श वस्तुपाठ निर्माण केला तर निश्चितच येणारी पिढी सुद्धा नम्र पिढी म्हणून उदयास येईल. कारण लहान मुलांवरील संस्कार, त्यांना घडवत असतात, प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ जॉन लॉक म्हणतो, लहान मुलाचे मन हे कोऱ्या पाठीप्रमाणे असते याचा अर्थ असा होतो की, आपण मोठ्या माणसांनी लहान मुलांच्या त्या कोऱ्या पाटीवर जसे संस्कार केले, तसे त्यांचे जीवन घडत जाते. लहान मुलांच्या जडणघडणीमध्ये अनेकदा त्याच्या आजूबाजूची परिस्थिती, माणसांचा संपर्क, त्याच्यावरील संस्कार, घरातील वागणूक, आई-वडिलांवरीलचे संस्कार या व इतर अनेक बाबी प्रभाव टाकत असतात. म्हणून, बनून लहान होता येते महान या न्यायाने लहान मुलांच्या मनामध्ये प्रेमाचे बीज' पेरले, तर त्यांना मोठे झाल्यावरही, लहान बनून जगायला शिकवले, तर नक्कीच, त्यांच्यातून सर्वगुणसंपन्न व महान माणूस व्हायला वेळ लागणार नाही. परंतु आजच्या स्थितीचा विचार केला तर हेही लक्षात येते की, जेव्हा लहान मूल मोठे होते, तेव्हा त्याच्या लक्षात येते, की मोठ्यांचे जग तर अनेक दुष्ट गोष्टींनी भरलेले आहे, मग तेच लहान मूल मोठे झाल्यावर, मोठ्यांच्या स्वार्थी दुनियेला कंटाळून, ईश्वराला लहान बनवण्यासाठी प्रार्थना करते. ही स्थिती त्याच्यावर का ओढवते? कारण मोठी माणसं, लहानपण सोडून जीवन जगतात. मग कालांतराने मोठ्यांच्या जगात या लहान लेकराला त्याला हवं असे वातावरण मिळत नसते. कारण मोठ्यांच्या जगात भौतिकता, आधुनिकता, स्वार्थ वृत्ती यांनी शिरकाव केल्याने, या लहान लेकराच्या निस्वार्थी वृत्तीला कुठेच थारा नसतो. मग तो श्वास गुदमरून गेल्यासारखा या समाजात गुदमरून जातो.

काळाची गरज एकच असेल, ती म्हणजे, लहान लेकरांना हुशार करणे, सुसंस्कारित करणे, परंतु त्यांना, गर्व, अहंकार, द्वेष, तिरस्कार, हेवा व मत्सर यांच्यापासून दूर ठेवणे. तर आणि तरच त्यांचे जग पूर्ण होईल. जिजामाता, शिवराय घडवू शकल्या कारण त्यांनी शिवरायांवर, बालपणीच संस्काराचे बी पेरले होते. असेच संस्काराचे बी, लेकरांच्या जगात पेरले गेले तर मोठेपणी संस्कारित मुले निर्माण होतील. पण, दुरून डोंगर साजरा म्हटल्याप्रमाणे, आज मोठ्यांचं जग खूप चकमकीत दिसत, परंतु त्यात नाना विकारांचा शिरकाव आढळून येतो. लहान लेकरांना, उद्याच्या युगाचे शिल्पकार बनवण्यासाठी मोठ्यांनी आपल्या वृत्तीत बदल करून व मोठ्यांनी त्यांच्या जीवनातील सर्व विकार मिटवण्यासाठी लहानपण, अंगीकारले, तर त्यांना लेकरांच जग विकार रहित करणे शक्य होईल. चला हेच आपल परमकर्तव्य मानुया, चला बीज लहानपणाच पेरूया. इंग्रजीत म्हटल्याप्रमाणे, Children are next to God in thoughts, havingpure hearts unselfish minds.Let's implement the same vision म्हणून म्हणावसं वाटत की, लहानपण देगा देवा नको कुणाचा हेवा देवा, समग्र विकार मिटून जावा लहानपण देगा देवा!

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहीपिंपळगाव, तालुका, मुदखेड, जि. नांदेड

# अजरामर लोकगायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली.

महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली....अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वानाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या हुदयात स्थान मिळवले आहे.



१९३३ साली अतिशय गरीब कुटुंबात अहमदनगर जिल्ह्यातील पिंपळगाव येथे त्यांचा झाला. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई भाऊ व बहिणीही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जनम लेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले.

नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले.

प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ. बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या.

२३ जून २००३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंडं देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# विधवांना सवलती व सहाय्य करून मुख्य समाज प्रवाहात आणणे गरजेचे

जगात व देशात विधवांची संख्या मोठी आहे . एका अंदाजानुसार जगात २४५ दशलक्ष विधवा स्त्रिया आहेत . त्यापैकी जवळपास ११५ दशलक्ष स्त्रिया दारिद्यात आहेत . लुम्बा फाऊंडेशन चे भगवान लुम्बा यांची आई पुण्यवती लिंबा या १९५४ साली विधवा झाल्या . त्यानंतर विधवा दिवस साजरा करावा अशी कल्पना लुंबा यांना सुचली . २००५ ते २०१० पर्यंत हा दिवस श्री लंका , नेपाळ, युके यूएसए बंगला देश , दक्षिण आफ्रिका तसेच भारत या देशात साजरा केला जाऊ लागला . २१ डिसेंबर २०१० या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघातर्फे या दिनाची अधिकृत घोषणा झाली. २०११ पासून हा दिवस अधिकृत पणे २३ जून रोजी साजरा करण्यास सुरवात झाली .

एकट्या राहणाऱ्या अनेक स्त्रियांची परिस्तिती अत्यंत हलाखीची आहे .अनेक स्त्रियांची मुले परदेशात नोकरीस आहेत किंवा शिकत आहेत . त्यांना आपल्या घरी एकटेच राहावे लागते . पेन्शन किंवा साठविलेली पुंजी असेल तर ठीक नाहीतर कोणी मुले बाळे नसल्यास अत्यंत अवधड परिस्थिती निर्माण होते . ज्या स्त्रिया आयुष्यभर नोकरी करत होत्या व शेवटी त्यांना वैधव्य आले त्यांना पैशाची फार चिंता नसते पण एकटेपणाची भावना वाढीस लागते . प्रत्येक कामासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते . समाजामध्ये सुद्धा विधवांना काही ठिकाणी सन्मान पूर्वक वागणूक दिली जात नाही . अलीकडे अनेक ठिकाणी त्यांना अनेक समारंभात बोलाविले जाते व सन्मान पूर्वक वागणूक दिली जाते हे बदलत्या काळाचे निदर्शक आहे . एखाद्या स्त्रीला अकाली वृद्धत्व आले तर तिला एकटीला आयुष्य कंठावे लागते . हे टाळण्यासाठी पुर्नविवाह करणे ही काळाची गरज आहे . यामुळे तिला पुढील आयुष्यात एका जोडीदार लाभून आयुष्य सुखात काढता येते . अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक दिनाच्या निमित्ताने झाली आहे . हेच या दिवसाचे वैशिष्ट्य आहे

सरकारने सुद्धा विधवांना अनेक प्रकारे साहाय्य करणे जरुरीचे आहे . त्यांना नोकरीत अग्रक्रम देणे, ज्यांना शिक्षण घावयाचे आहे त्यांना सुविधा पुरविणे, त्यांना समाजात सन्मान पूर्वक वागणूक मिळेल अशा पद्धतीने नियम व कायदे करणे ही कामे केली पाहिजेत

या विधवा दिनाच्या निमित्ताने या प्रश्नाला चालना देण्याचे काम सर्वांती करावे असे वाटते

**शांताराम वाघ**
पुणे

# स्वप्नाची ताकद

स्वप्नं ही माणसाच्या आयुष्यातील सर्वात मोठी प्रेरणा असते. ती केवळ डोळे मिटून पाहिलेली दृश्यं नसतात, तर ती आपल्याला उभं राहायला, चालायला आणि पळायला शिकवतात. प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या प्रवासाची सुरुवात एखाद्या छोट्याशा स्वप्नानेच झालेली असते. स्वप्नं माणसाला खंबीर बनवतात. जेव्हा आयुष्यात अडचणी येतात, तेव्हा हेच स्वप्न त्याला पुन्हा उभं राहायला मदत करतात.

आपली ध्येये, आकांक्षा आणि भविष्याबद्दलची दृष्टी यांमध्ये असलेली शक्ती. ही ताकद आपल्याला काहीतरी मोठे करण्यासाठी किंवा मिळवण्यासाठी ऊर्जा आणि प्रोत्साहन देते. आयुष्यात पुढे कसे जायचे, कोणते मार्ग निवडायचे हे स्पष्ट करते. कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते जेव्हा अडचणी येतात, तेव्हा स्वप्ने आपल्याला लढण्याची आणि पुढे जाण्याची ताकद देतात. नुसती कल्पना न ठेवता, ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देते. भविष्याबद्दल सकारात्मक राहण्यास आणि चांगले दिवस येतील यावर विश्वास ठेवण्यास शिकवते.

स्वप्नांची ताकद ही आपल्या प्रगतीची आणि यशाची गुरुकिल्ली आहे. स्वप्नं आपल्याला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यास मदत करतात. जेव्हा आपण मोठी स्वप्ने पाहतो आणि त्यासाठी मेहनत करतो, तेव्हाच आपल्याला यश मिळते. त्यामुळं, आपली स्वप्नं जपणं, त्यांना वास्तवात बदलण्याचा प्रयत्न करणे ही आपल्या जीवनात अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. स्वप्नांची ताकद ही आपल्या प्रगतीची प्रेरणा आणि प्रेरणादायक शक्ती असते. स्वप्नं आपल्याला ध्येय निश्चित करण्यास, नवीन संधी शोधण्यास आणि अडचणींवर मात करण्यासाठी प्रोत्साहन देतात. जेव्हा आपले स्वप्न मोठे असते, तेव्हा ते आपल्याला अधिक मेहनत घेण्याची आणि आपले सर्वोत्तम देण्याची प्रेरणा देतात. त्यामुळे, स्वप्नांची ताकद ही आपल्याला प्रगतीच्या मार्गावर चालण्याची ऊर्जा आणि दिशा प्रदान करते.

स्वप्न माणसाला सामान्यत च्या पलीकडे नेऊन असामान्य बनवतात. ती त्याच्या आतल्या क्षमतांना जागं करतात आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखवतात. स्वप्न हेच ध्येया चं पहिलं पाऊल असतं. पण फक्त स्वप्न पाहणं पुरेसं नसतं. त्यासाठी जिद्द, परिश्रम, आणि चिकाटी लागते. स्वप्नांमागे धावत राहणं हीच खरी यशाची गुरुकिल्ली असते. थोडक्यात, स्वप्नांची ताकद ही आपल्या प्रगतीची आणि यशाची गुरुकिल्ली आहे. ती आपल्याला आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर करण्यास आणि आपले जीवन अधिक अर्थपूर्ण बनवण्यास मदत करते.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड
मो. ९६८९११७१६९

# दीड लाख वृक्षबिजांची जैविक पद्धतीने लागवड

## चिखली गावात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत जागतिक योग दिन साजरा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून आरोग्य व पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यात संस्थेच्या प्रांगणात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. आ. प्रताप पाटील चिखलिकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कंधार तालुक्यातील चिखली गावात सुमारे दीड लाख वृक्षबीजांची जैविक पद्धतीने लागवड करण्यात आली.



सकाळी ७ वाजता संस्थेच्या बास्केटबॉल कोर्टवर आयोजित योग शिबिरात विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व कर्मचारीवर्गाने उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. योगतज्ज्ञ डॉ. लेनिना एस. व्ही. बी. व डॉ. अंकुश सावरकर यांनी विविध योगासने व प्राणायामाच्या तंत्रांचे सविस्तर मार्गदर्शन केले.

योगसत्रानंतर संस्थेच्या वतीने चिखली (ता. कंधार) येथे वृक्षबीज व वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. रस्त्याच्या दुतर्फा सुमारे ५ किलोमीटर क्षेत्रात १,५०,००० वृक्षबीजांची जैविक पद्धतीने पेरणी करण्यात आली. या उपक्रमाला लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. प्रतापराव पाटील चिखलीकर, संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे, अधिष्ठाता प्रा. संजय देठे, प्रबंधक डॉ. अरुण पाटील, डॉ. अंकुश सावरकर यांची उपस्थिती लाभली.

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी स्वतः वृक्षबीज पेरणी करत ग्रामस्थांना पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून दिले. वृक्षलागवड ही भविष्यासाठी दिलेली हरित भेट आहे. प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनीही मार्गदर्शन करताना सांगितले की, संस्थेने नेहमीच समाजहिताचे कार्य केले आहे. आजवर शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करताना आम्ही सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीची जाणीव ठेवून आम्ही नियमितपणे असे उपक्रम राबवतो. आजचा योग दिन आमच्यासाठी पर्यावरणप्रेम दिवस ठरला आहे.

कार्यक्रमास संदीप बीजमावर, भास्कर कदम, संस्थेचे कर्मचारी आणि चिखली गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे कर्मचारी, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आपले सुदृढ आरोग्य आहार, विहार व विचारांवर अवलंबून –शिवाजीराजे पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)–** मानसिक आजारांवर औषधोपचारासोबतच नियमित व्यायाम व ध्यानधारणा अत्यंत लाभदायक ठरते. आपले आरोग्य आपल्या आहार, विहार व विचारांवर अवलंबून असते, असे प्रतिपादन योगा अँड मेडिटेशन एक्स्पर्ट शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले आहे.



ज्ञानसंवर्धन मंडळ शेळगाव गौरी संचलित जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय धमर्बाद येथे जागतिक योगदिनानिमित्त आयोजित योग व विद्यार्थी पालक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात प्रमुख प्रशिक्षक म्हणून ते बोलत होते.

यावेळी प्राचार्य संजय पाटील शेळगावकर अध्यक्षस्थानी होते. धर्माबादचे नायब तहसीलदार गावंडे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. शिबिराच्या दुसऱ्या सत्रात उपस्थित विद्यार्थी व पालकांना संबोधित करताना शिवाजीराजे पाटील म्हणाले की, केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातूनच राष्ट्रनिर्मिती होऊ शकते या विचाराने प्रेरित होऊन विद्यार्थ्यांची सर्वगुण संपन्नता वृध्दिंगत करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या प्राचार्य संजय पाटील शेळगावकर यांच्यासारख्या अनेक इमिनंट फैकल्टी ह्या राष्ट्राची संपत्ती ठरतात. ग्रामीण भागात पुणे, मुंबई व कोट्यासारखे दर्जेदार शिक्षण धर्माबादमध्ये उपलब्ध करून दिल्याबद्दल शिवाजीराजे पाटील यांनी जिजामाता विद्यालयाच्या सर्व स्टाफचे अभिनंदन केले.

रवी पोतगंटीवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. सुत्रावे यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले. प्रा. मेशेट्टे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या शिबिराला बाबूराव प्यादेकर, नरेंद्र रेड्डी, गंगाधर तोटेवार, सदानंद देवके यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांसह विविध संस्थांमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा










### स्वारातीम विद्यापीठात योगासने

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात शनिवारी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रा. रुद्रावती चव्हाण यांनीही योगाभ्यासाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना नियमित योगाची सवय लावण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला प्रभारी कुलसचिव डॉ. एम. के. पाटील, मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे , प्रभारी वित्त व लेखा अधिकारी डॉ. भालचंद्र पराग, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. पराग खडके, डॉ. डी एम नेटके, डॉ. वैजयंता पाटील, अभियंता तानाजी हुस्सेकर तसेच विद्यापीठ संकुलातील सर्व संचालक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी सूत्रसंचालन केले तर क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मलिकार्जुन करजगी तसेच संजयसिंह ठाकूर, राम कीरकन, शिवाजी हंबर्डे, संभा कांबळे, बालाजी शिंदे आणि रतनसिंह पुजारी यांनी परिश्रम घेतले.

### वजिराबाद येथील मनपाच्या शाळेतील योग शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून वजिराबाद येथील मनपाच्या पीएमश्री मनपा शाळेत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त नितीन गाढवे व शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांच्या मार्गदर्शनात शाळेत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

स्नेहाताई मोहोकार व रंजनाताई सोनटक्के यांनी विद्यार्थी व शिक्षकांना योगाचे प्रशिक्षण दिले. योगासोबतच विविध प्राणायामचे सुद्धा प्रात्यक्षिक करण्यात आले. या योग शिबिरासाठी मनपा शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांनी योगा व प्राणायामचे महत्त्व विशद केले. तसेच शेवटी 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. या योग शिबिरोसाठी मुख्याध्यापक परमेश्वर माहुरे व शिक्षक मगरे, श्रीमती उन्हाळे, चांदणे, केंद्रे, श्रीमती वडजे, श्रीमती पतंगे, कदम, यम्मेवार, देवकते, पवार, निखिल, धनमने, खिल्लारे श्रीमती गिरी यांनी परिश्रम घेतले.

### सिडकोतील क्रीडासंकुल व कौठ्यात योग शिबीरात योगावर मार्गदर्शन

**नवीन नांदेड –** भाजपच्या सिडको मंडळ अंतर्गत योग गुरु गिरिधर मैड, सिडको मंडळाध्यक्ष सचिन रावका, येलूरकर डॉ. रमेश नांदेडकर विशाल गडबे, नवनाथ कांबळे पुरोहित सतीश गुरु पोतदार, नितीन कांबळे, संयोजक जनार्दन गुपिले, विनोद कांचनगिरे यांच्या संयुक्त विद्यमाने सिडको येथील क्रीडा संकुलात योग शिबीर घेण्यात आले.

तसेच कौठा येथील बालाजी मंदिरात योग शिक्षक बाबाराव इबितवार, डॉ. सायन्ना मठ्ठमवार यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी नगरसेवक राज गोरे, आशिष चितळे, भाजपा सिडको मंडळ अध्यक्ष सचिन रावका, सतीश बेरूळकर, गंगाबीशन कांकर, उत्तम वरपडे, युक्रांत देशपांडे, पंकज शिरभाते, संजय गिरी, अंबेकर, ज्ञानेश्वर कवाने, माला शर्मा, शर्मा तसेच जुना कौठा परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. सिडको येथील क्रीडा संकुल व जुना कौठा येथील आयोजित योग शिबिराला परिसरातील अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

### अहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालय सिडको

सिडको येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालयात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. या शिबिरात राधाबाई जाधव, योग प्रशिक्षिका सुमनताई जिरोनेकर यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथपाल सावित्रा शूरनर यांनी जिरोनेकर यांचा सत्कार केला. शिबिरासाठी संस्थेचे अध्यक्ष गोविंदराम शूरनर, डॉ. जिरोनेकर, मालोजी जाधव, सविता हेळगिरे, मदनेश्वरी देवकते यांनी यांनी परिश्रम घेतले.

### शेंबोलीच्या शाळेत योग दिन साजरा

शेंबोली (ता. मुदखेड) येथील प्राथमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, अनुलोम - विलोम, कपालभाती, शीर्षासन यासारख्या योगप्रकारांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी सादर केली. लक्ष्मण शिंदे यांनी योगाचे महत्त्व सांगितले. मुख्याध्यापक चंपत मुनेश्वर यांनी आभार मानले. यावेळी केंद्रप्रमुख अरुण अतनुरे, रामकृष्ण लोखंडे, मंगला महाजन, सुनिता केंद्रे, संगिता वादळे, जयश्री गायकवाड, छाया मठदेवरु गोविंद गोरेवाड, शोभा गोरेवाडा उपस्थित होते.

### श्री भास्करराव पाटील पब्लिक स्कूलमध्ये प्राणायामाचे विद्यार्थ्यांना धडे

**शंकरनगर–** येथील श्री भास्करराव बापुराव पाटील खतगावकर शाळेमध्ये जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात योगा गुरु प्राचार्य डी.पी.पांडेय यांनी योगाचे धडे दिले. कपालभारती, शीर्षासन, भस्तिका, आलोम, मिलोम, वज्रासन, अनेक योगासने करून दाखविले. धकाधकीच्या जीवनात प्रत्येकांने आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी प्राणायामाकडे वळलं पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या प्रवाहाबरोबरच आरोग्याची काळजी घेणं तेवढेच महत्वाचे आहे, योग्य आहार, दिनचर्या, व्यसनमुक्ती यासारख्या सवयीबाबत शालेय जीवनात विद्यार्थ्यांना माहितीरूपी अभ्यास असणे आज काळाची गरज असल्याचे असे मत प्राचार्य पांडेय यांनी व्यक्त केले. यावेळी शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी, पालक विद्यार्थी उपस्थित होते.

### भोकर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**भोकर (प्रतिनिधी)–** तालुका प्रशासन व विविध सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. येथील नगर परिषद कार्यालयाच्या प्रांगणात योग दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी योगासने केली. योगाचार्य डॉ. विजयकुमार दंडे यांनी उपस्थितांना विविध योग आसनांचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याधिकारी ऋषभ पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय जाधव, बी. आर. पांचाळ, डॉ. श्रृध्दा बेलगमवार, डॉ. साईनाथ वाघमारे, साहेबराव मोरे यांची उपस्थिती होती. शासनाचे विविध विभाग, युथिका योग सेंटर, सेवा समर्पण परिवार, सावली प्रतिष्ठान, समयदान मैत्री संघ, एक झाड मित्र परिवार यांच्यासह महसूल, पोलीस व पालिका कर्मचारी सहभागी झाले होते. प्रास्ताविकात तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी योग साधनेचे महत्त्व विशद केले. सुत्रसंचलन विशाल चौधरी यांनी केले.









### नांदेड रेल्वे विभागीय कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

नांदेड विभागातील विविध रेल्वे स्थानकांवरील कार्यालये आणि नांदेड रेल्वे विभागीय कार्यालयात रेल्वे इंस्टिट्यूट येथे योग दिवस साजरा करण्यात आला. विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले आणि इतर रेल्वे अधिकारी, कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. आर्ट ऑफ लिविंग समन्वयक शिवा बिरकले, श्रीमती प्रगती सिंग, प्रियंका गंगाधीरे, योग शिक्षक, नागेश अनिलकंठवार यांनी उपस्थितांना दैनंदिन जीवनात योगाचे महत्व सांगितले. योग केल्याने शारीरिक तसेच मानसिक आरोग्य लाभते हे त्यांनी उपस्थितांना सांगितले. त्यानंतर उपस्थितांना योग प्रशिक्षण देण्यात आले.

प्रदीप कामले म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात योग अभ्यासाचे महत्व पटवून दिले. योग साधना सुरु करायला वयाची अट नसते तसेच विशेष दिवसाची प्रतीक्षा न करता दररोज योग साधना केली पाहिजे, असे रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक प्रदीप कामले म्हणाले.

### सहयोगनगर येथील बुद्ध विहारात योगाची आसने

येथील सहयोगनगर येथील बुद्ध विहार परिसरात भाजपाचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांच्या पुढाकारातून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमात सुभेदार रामजी आंबेडकर सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी सामाजिक संस्था, महात्मा कबीर विद्यालय आणि स्थानिक नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

कार्यक्रमाला अशोक जोंधळे, विजयकुमार उजेडकर, आनंद जोंधळे, जयराम सोनकांबळे, गौतम गवारे, राजेश बीऱ्हाडे, दिपक गायकवाड, विशाल भद्रे, सोपान काळबांडे यांचाही सक्रीय सहभाग होता. एस. एस. जोशी, एन. बी. डुमणे यांनी योगाचे महत्त्व सांगितले. योग ही फक्त व्यायामपद्धती नसून ती जीवनशैली आहे. शरीर-मन-आत्मा यामधील संतुलन साधणारे हे शास्त्र आजच्या धकाधकीच्या जीवनात अनिवार्य बनले आहे. आरोग्यप्रती जागरूकता आणि सकारात्मक ऊर्जा देणारे उपक्रम समाजात सातत्याने व्हावेत, अशी अपेक्षा भाजपचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी व्यक्त केली.

### कुसुमताई माध्यमिक विद्यालयात प्रा. बालाजी शेट्ये यांचा मार्गदर्शन

सिडको, संभाजी चौकातील कुसुमताई विद्यालयात अंतरराष्ट्रीय योग दिन २१ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. यावेळी योग शिक्षक प्रा. बालाजी शेट्ये यांनी मार्गदर्शन केले.

कुसुमताई माध्यमिक विद्यालयात सकाळी ६.३० वा सर्व विद्यार्थी, शिक्षकांनी प्रांगणावर योगासन केली. या वेळी संस्थेचे सचिव संभाजीराव बिरादार, प्राचार्य सौ. शशिकलाताई जाधव- बिरादार उपस्थीत होते. प्राचार्या सौ. शशीकला बिरादार यांनी योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक शेख निजाम गवंडगावकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर विश्वास हंबर्डे यांनी सुरेख सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षिका सौ. उज्वला सावते यांनी उपस्थितांचे आभार मानले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नर्सिंग यलमलवाड, शंकर पाटील, एस. डी. जाधव, लक्ष्मण येसके, सूर्यकांत वडजे, युवराज शिंदे, सुनीता कोरे, वंदना सोनाळे, माधुरी माकणे, पद्मजा कुलकर्णी, सुमती व्यवहारे व शिक्षक बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले.

### मुदखेड येथील नगरपरिषद योग व्यायाम

**मुदखेड –** येथील नगरपरिषदमध्ये शनिवारी येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त डॉ. अनिरुद्ध लासोनकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे, लेखा अधिकारी शशिकांत पोळ, दिलीप पवार, रमेश सावंत, गणेश वडे, सचिन चुंचे, पिराजी जगताप, सुनील माळी, किशन बोकेफोड, राहुल चौदंते. रमेश हातागळे आदी कर्मचाऱ्यांनी योगासने केली.

### राजीव गांधी महाविद्यालय योगाच्या विविध आसनांचे प्रात्यक्षिक

येथील राजीव गांधी महाविद्यालयात शनिवारी योग शिबिर घेण्यात आले. प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे, योग प्रशिक्षक संजय देशमुख, ग्रामविकास अधिकारी यांनी पहिल्या सत्रात योगाची विविध आसने करून दाखविली. दुसऱ्या सत्रात योगा अँड वेलनेस या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. केले. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रा. डी. एच. म्हेत्रे, प्रा. डॉ. आर. एस. कोंडेकर, प्रा. डॉ. अर्जुनसिंग ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

### उमरी शहरात योगसाधनेने योग दिवस साजरा

**उमरी–** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उमरी शहरातील असंख्य योग साधकांच्या उपस्थितीत विविध प्राणायाम, योगासने करून योग दिन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने पहाटे पाच वाजता पासूनच शहराबाहेरील श्री हनुमान मंदिर मैदानात योग साधकांची गर्दी जमली. योगशिक्षक माधव जंगेवाड यांनी विविध योगाचे प्रशिक्षण दिले. यावेळी पत्रकार बी.व्ही. चव्हाण यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाचे महत्त्व सांगितले. दैनंदिन जीवनामध्ये प्रत्येकाला आपल्या निरोगी आरोग्यासाठी योग साधनेची आवश्यकता आहे. प्रत्येकाने सकाळचा एक ते दीड तासाचा महत्त्वाचा वेळ योग साधनेसाठी दिल्यास ते शारीरिक व्याधींपासून दूर राहतील. आनंदी जीवन जगता येईल. त्याबरोबरच दवाखान्याचा खर्च व मानसिक त्रास कायमचा टाळता येईल. त्यासाठी प्रत्येकाने योग साधना करावी, असे आवाहन चव्हाण यांनी केले. ज्येष्ठ नागरिक पंडितराव बेंबरे, गोविंद अट्टल, दिलीप चंदनवार, माधवराव बोडके, डॉ. श्याम उडतेवार, डॉ. सचिन गळगे, गणेश चव्हाण, गोविंद ढगे, गणेश यमेवार, शंकर पाटील, गंगाधर कस्तुरे, नरसिंग आरटवार, गणेश मदने, साईनाथ जमदाडे, अजय चव्हाण, सूर्यकांत येताळे, मनोज उमरीकर, योगेश पगलवाड, राजू गंगोत्री, आयुष परदेशी, दत्ता लकडेवाड, कमलाकर उत्तरवार आदींसह शहरातील अनेक योगसाधकांची यावेळी उपस्थिती होती.

### किनवटमध्ये योगदिन उत्साहात

**किनवट –** आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त योगगुरू रामदेव बाबा यांचे शिष्य योगशिक्षक अखिल खान व स्वाती सिरमनवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आ. भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील कलावती गार्डन येथे शनिवारी दि.२१ विविध योगासने करून योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन भाजपचे किनवट शहर तालुकाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी केले. विश्वास कोल्हारीकर, बाळकृष्ण कदम, जयराज वर्मा यांच्या संयोजनात हा कार्यक्रम पार पडला. केले. यावेळी माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, आनंद मच्छेवार, ज्येष्ठ नेते नारायणराव सिडाम, संतोष चनमनवार, प्रमोद पोहरकर, सतीश बिराजदार, राजेंद्र भातनासे, कृष्णा पाटील, शिवाजी आंधळे, कृष्णा कालकुंतावर, पूनम दीक्षित,राणी तिरमनवार, नरसिंग तक्कलवार,चंद्रकांत नेम्मानीवार, संतोष कणाके, सतीश राऊत, सुभाष निलगीरवार, डॉ.विश्वास सुंकरवार आदींसह अनेकांची उपस्थिती होती. किनवट शहरात विविध ठिकाणी योगदिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.









# प्रगतीमंत्र

## SBI मध्ये व्हा अधिकारी

### २६००+ पदांसाठी पुन्हा ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू




भारतातील सर्वात मोठी बँक SBI मध्ये सरकारी नोकरी मिळविण्याची सुवर्णसंधी आहे. होय, स्टेट बँक ऑफ इंडियाने (SBI) सर्कल बेस्ड ऑफिसर (CBO) भरतीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पुन्हा सुरू केली आहे. बँकेत अधिकारी म्हणून काम करू इच्छिणाऱ्या आणि कोणत्याही कारणास्तव अर्ज लवकर भरू न शकलेल्या उमेदवारांसाठी ही आनंदाची बातमी आहे. अशा परिस्थितीत, बँकेच्या अधिकृत वेबसाइट sbi.co.in वर अर्ज प्रक्रिया लवकर पूर्ण करा.


एकूण २,९६४ पदे उपलब्ध आहेत, ज्यात २६०० नियमित पदे आणि ३६४ पूर्वी प्रलंबित पदे आहेत. अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० जून २०२५ आहे. सीबीओ पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे पदवीधर पदवी असावी. तसेच, त्यांना शेड्युल्ड कमर्शियल बँक किंवा प्रादेशिक ग्रामीण बँकेत अधिकारी म्हणून किमान दोन वर्षांचा अनुभव असावा. उमेदवाराचे वय ३० एप्रिल २०२५ रोजी २१ ते ३० वर्षांच्या दरम्यान असावे. नियमांनुसार उच्च वयोमर्यादेतही सूट देण्यात आली आहे. एससी/एसटीसाठी ५ वर्षे, ओबीसी (एनसीएल) साठी ३ वर्षे आणि पीडब्ल्यूबीडी उमेदवारांसाठी १० ते १५ वर्षे सूट देण्यात आली आहे. बँकेच्या या भरती प्रक्रियेत ऑनलाइन चाचणीचा समावेश आहे. यानंतर स्क्रीनिंग, मुलाखत आणि स्थानिक भाषेतील प्रवीणता चाचणी घेतली जाईल. अंतिम निवड ऑनलाइन चाचणी आणि मुलाखती दरम्यान ७५:२५ च्या प्रमाणात केली जाईल. ऑनलाइन चाचणीमध्ये १२० वस्तुनिष्ठ प्रकारचे प्रश्न असतील, जे इंग्रजी भाषा (३० गुण), बँकिंग ज्ञान (४० गुण), सामान्य जागरूकता/अर्थव्यवस्था (३० गुण) आणि संगणक अभियोग्यता (२० गुण) मध्ये विभागले जातील.

#### अर्ज कसा करावा ?

- सर्वप्रथम एसबीआय करिअर्स bank.sbi/web/careers/current-openings च्या अधिकृत वेबसाइटवर जा.
- CBO Recruitment 2025 Link सेक्शनमध्ये Apply Online वर क्लिक करा
- आता वैध ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर वापरून नोंदणी करा.
- अर्ज फॉर्म भरा आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. जसे की फोटो, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा, हस्तलिखित घोषणा, शैक्षणिक आणि अनुभव प्रमाणपत्रे आणि आयडी पुरावा.
- ऑनलाइन अर्ज शुल्क भरा, फॉर्म सबमिट करा आणि भविष्यातील संदर्भासाठी फॉर्मची प्रिंट आउट घ्या.
- या भरतीशी संबंधित इतर कोणत्याही माहितीसाठी, उमेदवार एसबीआयच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात.




## गणितात बीए, बीकॉम किंवा बीएससी, कोणता कोर्स चांगला?



**गणित हा एक विषय आहे जो वित्त क्षेत्रांपासून ते वैज्ञानिक संशोधनापर्यंत सर्वत्र उपयुक्त आहे. सर्वप्रथम, बहुतेक विद्यार्थ्यांना हा विषय आवडत नाही, परंतु काही विद्यार्थी त्यात प्रभुत्व मिळवतात. अशा परिस्थितीत तुम्ही बारावीपर्यंत गणिताचा अभ्यास करता, पण जेव्हा पदवीपूर्व स्तरावर अभ्यासक्रम निवडण्याचा प्रश्न येतो तेव्हा लोक गोंधळून जातात.**

- बीएससी गणित (ऑनर्स): विज्ञान आणि तंत्रज्ञानात करिअर करण्यासाठी सर्वोत्तम पर्याय : बीएससी गणित (ऑनर्स) हा एक अभ्यासक्रम आहे जो गणिताच्या जटिल तत्त्वांवर आणि साइंटिफिक ॲप्लीकेशन्सवर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये, विद्यार्थ्यांना गणिताच्या तांत्रिक आणि विश्लेषणात्मक पैलूंबद्दल सखोलपणे सांगितले जाते. डेटा सायन्स, संशोधन, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट किंवा सांख्यिकी विश्लेषण यासारख्या क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा एक चांगला करिअर पर्याय आहे.
- बीकॉम गणित (ऑनर्स): वाणिज्य आणि वित्त क्षेत्रात रस असलेल्यांसाठी... : भविष्यात वाणिज्य आणि वित्त क्षेत्रात मोठी भूमिका बजावू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बारावीनंतर बीकॉम गणित (ऑनर्स) हा एक चांगला पर्याय असू शकतो. हा अभ्यासक्रम गणित आणि लेखा, अर्थशास्त्र आणि वित्त यासारख्या व्यावसायिक विषयांना एकत्र करतो. या अभ्यासक्रमाद्वारे संख्यात्मक क्षमता आणि आर्थिक समज सुधारते. पदवीधर विद्यार्थ्यांना बँकिंग, शेअर बाजार, जोखीम व्यवस्थापन किंवा व्यवसाय विश्लेषणात चांगले करिअर संधी आहेत.
- बीए गणित (ऑनर्स): सामाजिक विज्ञान आणि अध्यापन क्षेत्रासाठी सर्वोत्तम : जर तुम्हाला गणिताच्या सैद्धांतिक पैलू आणि आंतरविद्याशाखीय अनुप्रयोगांमध्ये रस असेल, तर बीए गणित (ऑनर्स) तुमच्यासाठी परिपूर्ण पर्याय असू शकतो. हा अभ्यासक्रम गणिताला सामाजिक विज्ञान आणि मानव्यशास्त्रांशी जोडतो, ज्याद्वारे विद्यार्थी त्यांचे विश्लेषणात्मक विचार आणि संवाद कौशल्य विकसित करतात. हा अभ्यासक्रम अध्यापन, सरकारी नोकरी किंवा नागरी सेवेत जाणाऱ्या उमेदवारांसाठी चांगला आहे.

#### निवड कशी करावी ?

- गणितात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, या तिन्हीपैकी अभ्यासक्रमांची निवड पूर्णपणे तुमची आवड आणि करिअरची उद्दिष्टे काय आहेत यावर अवलंबून असते.
- जर तुम्हाला गणित शिकवण्याचा अभ्यास सामाजिक शास्त्रांशी जोडून करायचा असेल, तर बीए मॅथ्स (ऑनर्स) निवडा.
- जर तुमची आवड वित्त आणि व्यवसायात असेल, तर बीकॉम मॅथ्स (ऑनर्स) चांगले राहील.
- दुसरीकडे, जर तुम्हाला वैज्ञानिक संशोधन किंवा तांत्रिक क्षेत्रात जायचे असेल, तर बीएससी मॅथ्स (ऑनर्स) तुमच्यासाठी योग्य पर्याय असेल.






## १२ वीनंतर हे ५ टेक्नॉलॉजी कोर्सेस करा, अभ्यासासोबतच भरपूर पैसे कमवा!

**१२ वीनंतर करिअर सुरू करण्यासाठी टेक्नोलॉजी केंद्रित कोर्सेस हा एक स्मार्ट पर्याय ठरतो. आम्ही तुम्हाला अशा काही कोर्सेसबद्दल सांगत आहोत, जे डिजिटल युगाच्या मागणीनुसार डिझाइन केलेले आहेत. हे कोर्सेस आधुनिक शिक्षण देतात आणि तुम्हाला नोकरीसाठी तयार करतात...**

बदलत्या युगात, कृत्रिम बुद्धिमत्तेने प्रत्येक क्षेत्रात आपले पंख पसरवले आहेत. शिक्षण क्षेत्रदेखील याला अपवाद नाही. आजच्या काळात तंत्रज्ञान आणि डेटा सायन्स क्षेत्रात प्रचंड करिअरच्या संधी आहेत. हे लक्षात घेऊन, देशातील अनेक प्रतिष्ठित संस्था आता बारावीनंतर थेट ऑनलाइन पदवीपूर्व अभ्यासक्रम देत आहेत. हे वर्क-इंटिग्रेटेड लर्निंग प्रोग्राम्स (WLP) आणि डिग्री अप्रेंटिसशिप (DA) अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत काम करण्याची संधी देतात. चांगली गोष्ट म्हणजे त्यांचे वर्ग आठवड्याच्या शेवटी किंवा संध्याकाळी आयोजित केले जातात. त्याचा उद्देश विद्यार्थी एकाच वेळी नोकरी आणि अभ्यास दोन्ही करू शकतात.



### बीएससी इन डेटा सायन्स

जर तुम्हाला डेटा विश्लेषण, एमएल आणि स्टॅटिस्टिकल मॉडेलिंगमध्ये करिअर करायचे असेल तर हा एक उत्तम पर्याय आहे. या क्षेत्रातील व्यावसायिकांची मागणी सतत वाढत आहे. बीएससी इन डेटा सायन्समध्ये, विद्यार्थ्यांना खऱ्या प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळते, जे तुम्हाला डेटा विश्लेषण आणि एआयच्या जगात पाऊल ठेवण्यासाठी तयार करते. हा कोर्स करण्यासाठी तुम्हाला २ लाख ७३ हजार ६०० रुपये +जीएसटी इतका खर्च करावा लागतो.

### एआय अँड मशीन लर्निंग

आयआयआयटी वडोदरा येथून डेटा सायन्समध्ये बीएससीचा अभ्यास करण्याव्यतिरिक्त, तुम्ही एआय आणि एमएलचा कोर्स देखील करू शकता. हा कोर्स अशा विद्यार्थ्यांसाठी आहे ज्यांना एआयच्या प्रगत स्तरावर काम करायचे आहे. यात डीप लर्निंग, न्यूरल नेटवर्क्स आणि प्रेडिक्टिव मॉडेलिंगसारखे विषय आहेत. या कोर्समध्ये उद्योगाशी एकात्मिक प्रशिक्षण देखील आहे, जे विद्यार्थ्यांना खरा एआय अनुभव देते. हा कोर्स करण्यासाठी, तुम्हाला दरवर्षी सुमारे २,४९,७०० रुपये (+ जीएसटी) खर्च करावे लागतील.

### बीसीए - जैन विद्यापीठ

तुम्ही भारतातील टॉप खाजगी आणि डीम्ड विद्यापीठांपैकी एक असलेल्या जैन विद्यापीठातून बीसीए करू शकता. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, प्रोग्रामिंग आणि डेटाबेस व्यवस्थापनात रस असलेल्यांसाठी हा कोर्स सर्वोत्तम आहे. आता तुम्हाला वाटेल की यात काय खास आहे, तर आम्ही तुम्हाला सांगतो की येथे कोडिंगवर विशेष लक्ष दिले जाते आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. याचा फायदा असा आहे की अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी आयटी आणि सॉफ्टवेअर क्षेत्रात काम करण्यास पूर्णपणे तयार होतात. या अभ्यासक्रमाची वार्षिक फी २२,५०० रुपये + जीएसटी आहे.

### भौतिकशास्त्र, गणित आणि सीएसमध्ये बीएससी

जैन विद्यापीठात हा एक आंतरविद्याशाखीय कार्यक्रम दिला जात आहे. यात विज्ञान आणि संगणक दोन्हीचे सर्वोत्तम संयोजन आहे. हा अभ्यासक्रम विशेषतः अशा विद्यार्थ्यांसाठी आहे ज्यांना विश्लेषण किंवा संशोधन करायचे आहे. तो पायाभूत ज्ञानासह भविष्यातील अभ्यास आणि करिअरसाठी एक मजबूत पाया घालतो. तुम्ही हा अभ्यासक्रम दरवर्षी १५,००० रुपयांना करू शकता. या अभ्यासक्रमाची फी प्रत्येक संस्थेनुसार वेगवेगळी असू शकते.

### संगणक विज्ञानात बीएससी - IIIT वडोदरा

हा अभ्यासक्रम तुम्हाला उच्च स्तरावरील सॉफ्टवेअर अभियांत्रिकी भूमिकांसाठी तयार करतो, ज्यामुळे तुम्ही १२ वी नंतर लगेच नोकरीसाठी तयार व्हाल. हा अभ्यासक्रम क्लासिक सॉफ्टवेअर अभियांत्रिकी इच्छुकांसाठी आदर्श आहे. येथे सिस्टम डिझाइन, अल्गोरिदम आणि प्रोग्रामिंगवर सखोल शिकवले जाते. त्याची फी प्रति वर्ष २,४९,७०० रुपये + GST पर्यंत असू शकते.

## 'इग्नू'चे प्रवेश सुरू

**इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठात (इग्नू) जुलै २०२५ सत्रासाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. डिप्लोमा, बॅचलर्स, पोस्ट ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा, सर्टिफिकेट या अनेक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी ignouadmission.samarth.edu.in वर ऑनलाइन अर्ज करू शकतात. फॉर्म भरण्याची पद्धतदेखील जाणून घेऊया...**

इग्नू वर्षातून दोनदा - जुलै आणि जानेवारी सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया चालवते. जर तुम्हाला ऑनलाइन अभ्यास करायचा असेल किंवा दूरस्थ शिक्षण (दूरून अभ्यास) करायचे असेल तर तुमच्याकडे चांगली संधी आहे. विद्यापीठाने त्यांच्या वेबसाइटवर कॉमन प्रॉस्पेक्टसदेखील अपलोड केले आहेत.

**अर्ज कसा करावा...**

जानेवारी २०२५ सत्रानंतर, आता जुलै सत्रासाठी, विद्यापीठाने मुक्त आणि दूरस्थ शिक्षण (ODL) आणि ऑनलाइन पद्धतीने अनेक कार्यक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. इग्नूच्या ऑनलाइन आणि दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार १५ जुलैपर्यंत फॉर्म भरू शकतात. यासाठी, प्रथम इग्नूच्या वेबसाइट ignouiop.samarth.edu.in वर जा. आता विद्यार्थ्यांना इग्नू दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम प्रवेश २०२५ लिंकवर जाऊन स्वतःची नोंदणी करावी लागेल. आता तुम्हाला तुमचा आयडी आणि पासवर्ड टाकून पुन्हा एकदा लॉगिन करावे लागेल. यानंतर, तुम्हाला ज्या अभ्यासक्रमासाठी अर्ज करायचा आहे त्याचा प्रवेश फॉर्म भरावा लागेल. फॉर्ममध्ये विचारलेले सर्व कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करावी लागतील. यानंतर, विहित नोंदणी शुल्क भरा. अर्ज फॉर्म सबमिट केल्यानंतर, पुष्टीकरण पृष्ठ डाउनलोड करा. विद्यापीठ ३०० हून अधिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देईल. यामध्ये ४८ पदवीपूर्व, ७५ पदव्युत्तर पदवी समाविष्ट आहे, ज्यामध्ये अनेक पदव्युत्तर पदविका, पदविका, पदव्युत्तर प्रमाणपत्र, प्रमाणपत्र आणि प्रशंसा/जागरूकता कार्यक्रम समाविष्ट आहेत. संपूर्ण माहिती इग्नूच्या वेबसाइटवरून मिळू शकते.

## ऑफिसमध्ये चुकूनही करू नका या ८ गोष्टी

**कामाच्या ठिकाणी तुमची चांगली प्रतिमा तुमच्या करिअरला गती देतेच, शिवाय सहकाऱ्यांसोबत आणि वरिष्ठांशी चांगले संबंध निर्माण करते. परंतु कधीकधी काही सवयी तुमच्या प्रतिमेला हानी पोहोचवू शकतात. त्याबद्दल काळजी घेणे खूप गरजेचे आहे. ऑफिसच्या शिष्टाचारातील ८ वाईट सवयी कोणत्या आहेत ज्या तुमची प्रतिमा खराब करतात आणि तुम्हाला नोकरीच्या पगारवाढीमध्ये बढती देऊ शकतात जाणून घेऊया...**

जर तुम्ही टीमच्या अपेक्षांनुसार काम केले नाही आणि नेहमी असे वाटत असेल की तुमचे काम दुसऱ्याने करावे, तर ही पद्धत तुमच्याविरुद्ध वातावरण निर्माण करू शकते. सहकारी तुमच्यापासून दूर जाऊ लागतात. जर तुम्हाला तुमचे काम आवडत नसेल, तर नवीन संधी शोधा. पण जर तुम्हाला त्याच टीमचा भाग राहायचे असेल, तर तुम्हाला तितकेच कठोर परिश्रम करावे लागतील. अशा ८ सवयी पुढे सांगितल्या जात आहेत, जर तुमच्याकडे त्यापैकी एकही असेल तर ती तुमच्या विरुद्ध जाऊ शकते. तुम्ही त्या ताबडतोब सुधारल्या तर बरे होईल.



- अहंकार : व्यावसायिक वाढीसाठी आत्मविश्वास आवश्यक आहे. पण जेव्हा तो अहंकारात बदलतो, तेव्हा हानिकारक ठरू शकते. तुमच्या यशाबद्दल नम्र राहा आणि संघर्ष करणाऱ्या सहकाऱ्यांना मदत करा. जास्त स्पर्धा तुमच्या स्वतःच्या वाढीलाही अडथळा आणू शकते.
- नैतिक शिष्टाचाराचा अभाव : अयोग्य पोशाख, वैयक्तिक बाबींवर चर्चा, ईमेल किंवा ऑफिसमधील संवादात गैरवर्तन, मोठ्या आवाजात बोलणे किंवा अश्लील विनोद करणे... हे सर्व ऑफिसच्या कार्य संस्कृतीच्या विरुद्ध आहे. व्यावसायिक वातावरणात, तुम्हाला व्यावसायिकपणे वागावे लागते.
- अनावश्यक हस्तक्षेप : प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याचे काम त्याच्या स्वतःच्या शैलीत करण्याचा अधिकार आहे. तुमच्या कामाच्या क्षेत्रात हस्तक्षेप करण्याची जबाबदारी तुमच्याकडे नसल्यास, इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका.
- श्रेय काढून घेणे : जर तुम्ही दुसऱ्याच्या कामाचे श्रेय घेतले तर ते लवकरच उघडकीस येईल. हे तुमच्या विश्वासार्हतेला मोठा धक्का असेल. तुमच्या कामगिरीचे श्रेय संपूर्ण टीमला देणे शहाणपणाचे आहे.



बॉसलाही चांगले काम करणाऱ्या व्यक्तीची कल्पना येईल.

- बैठकीत संयमाने बोला : बैठकीदरम्यान, जास्त बोलणे किंवा पूर्णपणे शांत राहणे, दोन्ही योग्य नाहीत. तुमचा मुद्दा स्पष्टपणे आणि कमी शब्दात मांडा. इतरांना बोलण्याची संधी द्या आणि तुम्हीही महत्त्वाच्या गोष्टी वेळेवर मांडल्या पाहिजेत.
- खुशामत : बॉसची खुशामत करणे काही काळासाठी फायदेशीर वाटू शकते, परंतु ते तुमच्या सहकाऱ्यांमध्ये तुमची प्रतिमा खराब करू शकते. दुसरीकडे, बॉसवर सतत टीका करणे देखील योग्य नाही. संतुलित आणि प्रामाणिक वर्तनानेच तुम्हाला आदर मिळेल.
- जास्त बोलणे : जास्त बोलणारे कर्मचारी अनेकदा अविश्वसनीय मानले जातात. दुसरीकडे, खूप शांत राहणे देखील तुम्हाला वेगळे करू शकते. ऑफिसमध्ये संभाषण महत्वाचे आहे, परंतु त्यात संतुलन राखा. असंबद्ध बोलू नका आणि इतरांचा विश्वास राखा.
- सतत तक्रार करणे : कामाच्या ठिकाणी येणाऱ्या आव्हानांबद्दल सतत रडणे योग्य नाही. ऑफिस ही अशी जागा आहे जिथे प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते. अशा परिस्थितीत, समस्येऐवजी उपायावर लक्ष केंद्रित करणे महत्वाचे आहे. इतरांनाही मदत करा.



## प्लॉट विकणे आहे

प्लॉट क्रमांक ७१ गट क्रमांक ३५८ तरोडा बुद्रुक, अंबिका सन सिटी ,शिव रोड तरोडा ( बु)येथील १२०० स्केअर फुटाचा दक्षिणमुखी तीस फुटाचे रोडवरील प्लॉट वाजवी किंमत आल्यास विकने आहे

**-:संपर्क -: मो.क्र-८६९८६९१२५७**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार अशोक पि.बापुराव जाधव वय ४८ वर्षे धंदा शेती रा.करमाळा ता.लोहा जि.नांदेड ह.मु.भालचंद्र निवास ठाणे ता.जि.नांदेड येथील रहिवाशी असून त्यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहिर प्रगटन देण्यात येते की,

माझे पक्षकार हे अज्ञान असतांना त्यांच्या वडीलांना सन १९८५ साली खरेदीखत दस्त क्र.१७४८/१९८५ नुसर शेत गट क्र.६५ क्षे.०.८१ आर ज्याची चर्तुसिमा पुर्वेस- प्रतिवादीचे शेत, पश्मिस- धोंडीबा विठ्ठल जाधव, दक्षिणेस-शिवाजी तुळशीराम व तिरूपती नबरचे शेत, उत्तर-मीना चांदू जाधवचे शते स्थित मौजे करमाळा ता.लोहा जि.नांदेड येथे वरील चर्तुसिमेच्या आतील जमिन खरेदी घेतली आहे.तेंव्हापासून सदर ०.८१ आर जमिन माझ्या पक्षकाराच्या व त्याचा भाऊ नामे बालाजी यांच्या ताब्यात आहे. सदरील जमिनीचे खरेदीखत झाल्यानंतर फेरफार होवून ७/१२ देखील तयार करण्यात आला.परंतू कालातराणे चुकून माझ्या पक्षकाराचे ७/१२ तील मालकीचे क्षेत्रफळ की होवून साहेबराव पि.रावसाहेब जाधव यांच्या नावाने लागेले आहे. वास्तविक पाहता साहेबरावच्या मालकीची सदरील गटात ७/१२ प्रमाणे कोणतीही मालकी व ताब्याची जमिन नाही

तरी वरील व्यक्तीच्या नावावरील गट क्र.६५ मधील कोणतीही जमीन खरेदी-विक्रीचे अथवा सौदाचिठ्ठीचे व्यवहार करू नयेत तसेच हस्तांतराचे देखील व्यवहार करू नयेत करण माझे पक्षकाराची वरील व्यक्तीच्या नावे असलेल्या जमिनीत हितसंबंध असून माझ्या पक्षकाराने दिवाणी न्यायालय क.स्तर लोहा येथे दिवाणी दावा देखील केलेला आहे. जर कोणीही असे कोणतेही व्यवहार वरील व्यक्तीसोबत केल्यास त्या व्यवहाराची जबाबदारी माझे पक्षकाराची राहणार नाही तसेच अशा व्यक्तीस दाव्यात पार्टी केले जाईल व खरेदीखत अथवा केला व्यवहार माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**मार्फत**
**ॲड.एस.के.ताटे**

**जाहीर प्रगटन देणार**
**अशोक पि.बापुराव जाधव**
**रा.करमाळा ता.लोहा जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, स्थित मौजे भोकर ता. भोकर जि. नांदेड येथील गट क्रमांक १८३ मधील प्रतापचंद्र बाजीराव देशपांडे यांच्या नावाने असलेले क्षेत्रफळ ०१ हेक्टर १४ आर तसेच मौजे भोकर ता. भोकर जि. नांदेड येथील गट क्रमांक ३९१ मधील प्रतापचंद्र बाजीराव देशपांडे यांच्या नावाने असलेले क्षेत्रफळ ० हेक्टर ८६ आर सदर वरील संपुर्ण शेतजमीनीमध्ये माझे पक्षकार अमोल प्रतापचंद्र देशपांडे रा. भोकर ता. भोकर जि. नांदेड यांचा कायदेशीर हिस्सा आहे. तसेच वरील संपुर्ण मालमत्ता ह्या माझ्या पक्षकाराच्या वडीलोपार्जीत मालमत्ता असल्यामुळे व वरील संपुर्ण मालमत्तेची अद्यापर्यंत माझ्या पक्षकारामध्ये व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये कायदेशीर वाटणी झालेली नसल्यामुळे वरील शेतजमीनीमध्ये माझ्या पक्षकाराचा कायदेशीर हिस्सा आहे व सदर शेतजमीनीमध्ये माझ्या पक्षकाराचा ताबा आहे असे असतांना देखील माझ्या पक्षकाराचे वडील प्रतापचंद्र बाजीराव देशपांडे हे माझ्या पक्षकारांच्या परस्पर एकत्र कुटुंबाची कोणतीही कायदेशीर गरज नसतांना व एकत्र कुटुंबाची कोणतीही संमती नसतांना वरील जमीन विक्री करण्याच्या तयारीत आहेत.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, वरील वर्णनाची मालमत्ता माझ्या पक्षकाराचे वडील प्रतापचंद्र बाजीराव देशपांडे हे विक्री करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे सर्व जनतेस सदर जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, वरील शेतजमीनीबाबत कोणीही वरील व्यक्तीसोबत खरेदी व्यवहार करु नये. जर असा खरेदीचा व्यवहार कोणी केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही खरेदी करणाऱ्यावर राहील.करिता सबब हे जाहीर प्रगटन देत आहे.

**मार्फत**
**ॲड. शिवाजी व्ही. कदम**
**नागापुरकर**
**जिल्हा व सत्र न्यायालय, भोकर**
**मो.नं. ८८०६७५९७२२**

**जाहीर प्रगटन देणार**
**अमोल प्रतापचंद्र देशपांडे**
**रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड**
**मो.९४२१६५६९२२**

## जाहीर प्रगटन

मौजे बळीरामपुर ता.जि. नांदेड ग्रामपंचायत हद्दीतील शेत गट नंबर ३४ पैकी भारतनगर मधील प्लॉट नंबर ४७ साईज एकुण क्षे.७५० चौरस फुटाचा प्लॉट सय्यद लईक सय्यद रसुल रा.रहेमतनगर देगलूर नाका नांदेड व अब्दुल खलील अब्दुल सत्तार कुरेशी रा.हबीबीया कॉलनी नांदेड यांचेकडून माधव किशनराव पोतरे रा.पिपराळा ता.हदगाव जि.नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चुर्तसिमा लेआउट प्रमाणे

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**माधव किशनराव पोतरे**
**रा.पिपराळा ता.हदगाव जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

मौजे बळीरामपुर ता.जि. नांदेड ग्रामपंचायत हद्दीतील शेत गट नंबर ३४ पैकी भारतनगर मधील प्लॉट नंबर १८ साईज एकुण क्षे.६०० चौरस फुटाचा प्लॉट सय्यद लईक सय्यद रसुल रा.रहेमतनगर देगलूर नाका नांदेड व अब्दुल खलील अब्दुल सत्तार कुरेशी रा.हबीबीया कॉलनी नांदेड यांचेकडून विजय बाबु राठोड रा.गुरुनगर नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चुर्तसिमा लेआउट प्रमाणे

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**विजय बाबु राठोड**
**रा.गुरूनगर नांदेड**

**कार्यालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड.**
सहकार भवन, भू-विकास बँक इमारत पहिला मजला, आय.टी.आय. समोर, नांदेड.
{ Email ID - dyrcsnanded@gmail.com }

जा.क्रं. उपनिनां कक्ष-१/प्रा.मत.यादी कार्यक्रम (क)वर्ग संस्था/ 865 /२०२५ दिनांक :- २० जून, २०२५.

**व्यवस्थापक समिती पंचवार्षीक निवडणूक कार्यक्रम सन २०२५ ते २०३० (क वर्ग संस्था)**
**मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम, १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम,२०१४ (सुधारणासह) चे नियम २ (तीन) (१ ते १२) आणि नियम ७५(२) (क) तसेच मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. १७७१ दि. २०/०५/२०२० मधील तरतुदी/सुचने नुसार दिनांक ०१/०१/२०२५ या अर्हता दिनांकावर तयार केलेल्या खालील एकुण (०४) सहकारी संस्थेच्या प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करीत आहे.

| अ.क्रं. | संस्थेचे नांव |
|---|---|
| १ | पगारदार सहकारी संस्था कर्मचारी व गटसचिवाची सहकारी पतपेढी म. नांदेड. |
| २ | नांदेड जिल्हा सहकारी खाते कर्मचारी (ऑडीटींग) सहकारी पतपेढी म. नांदेड. |
| ३ | अष्टविनायक शेतीमाल खरेदी विक्री सहकारी संस्था, म. नांदेड. |
| ४ | नांदेड जिल्हा महिला विकास सहकारी पतपुरवठा संस्था म. नांदेड. |

| अ.क्रं. | तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ / ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | २३/०६/२०२५ | स. ११.०० वाजता | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड व सबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर. |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप मागविणे. | २३/०६/२०२५ ते ३०/०६/२०२५ | कार्यालयीन वेळेमध्ये | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड. |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप वर निर्णय घेणे. | ०६/०७/२०२५ | कार्यालयीन वेळेमध्ये | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड. |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | ०६/०७/२०२५ | दु. १७.०० वाजता | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड व सबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर. |

सही-
(सिध्दार्थ गायकवाड)
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,ता.नांदेड.

प्रत, १. प्रस्तुत कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी.
२. अध्यक्ष/सचिव, यांना देऊन सुचीत करण्यात येते की, सदरील प्रारुप मतदार यादी आपले संस्थेच्या कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करावी व प्रसिध्दी अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर करावा.

Gaikwad S.S.
20.06.25
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,ता.नांदेड.

**नमुना १**
**(नियम १४ व २४ पहा)**
**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ यांच्या कलम १५०(२)अन्वये सुचना**
**ज्याअर्थी तालुका-भोकर गाव -भोकर**

**गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे**

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोदीचा अनुक्रमांक | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरूप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भूमापन व उपविभाग क्रमांक |
|---|---|---|
| ११११२८ | नोंदीचा प्रकार-खरेदी , माहिती मिळालेचा दिनांक १७/६/२०२५ फेरफारचा दिनांक १८/६/२०२५ लिहून देणार-चंद्रकांत पोशट्टी कोशबतवार रा.भोकर ( खाता क्रमांक ४१९९) यांचे गट/ सर्व्हे क्रमांक १३६, लागवडीयोग्य क्षेत्र १.७७३४ हे.आर. चौ.मी पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११ हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी हे त्यांनी सदरील गट क्र.१३६ मध्ये प्लॉटीग असून कै.लक्ष्मीबाई पोशट्टी कोसबतवार यांनी ह्यात असतांना दस्त क्र. २५९ दिनांक ५/३/२००७ रोजी विक्री केला होता.आज रोजी त्यांच्या वारसाच्या नावे आहे.तरी करीता नोंद घेण्यात आली. लिहुन घेणार :सुनिता शंकर खंदारे, ( खाता क्रमांक :- १०६०५) गट / सर्व्हे क्रमांक १३६ लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११ हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी यांना दुय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक २५९ दिनांक ५/३/२००७ प्रमाणे रक्कम रुपये ५०,००० घेऊन खरेदी दिली. सबब खरेदी घेणा-याचे नाव गाव नमुना नं. ७/१२ वर दाखल केले. | १२८ |

आणि ज्याअर्थी, तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन / फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते ; आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे.

त्याअर्थी आता मी, अनिल तुकाराम मुनेश्वर ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसूल अधिकारी याव्द्‌रे, उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. ग्राम महसूल अधिकारी भोकर यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गृहीत धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण -भोकर दिनांक ९/५/२०२५
नाव पत्ता
चावडीवर नोटीस प्रदर्शित केल्याची तारीख -
चंद्रकांत पोशट्टी कोसबतवार -
सुनिता शंकर खंदारे **-अनिल तुकाराम मुनेश्वर तलाठी सज्जा भोक ता.भोकर जि.नांदेड**

**ग्रामविकास शिक्षण संस्था चिखली, ता.कंधार जि.नांदेड संचलित,**

## अध्यापक विद्यालय (डी.एल.एड.)

**मांजरम ता.नायगाव जि.नांदेड**

**पाहिजेत**

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | प्राचार्य | 01 | एम.ए.,एम.एड.बी + (5 वर्षाचा अनुभव ) |
| 2 | सहशिक्षक मराठी | 01 | एम.ए.बी.एड / एम.एड. बी+ |
| 3 | सहशिक्षक हिंदी | 01 | एम.ए.बी.एड / एम.एड. बी+ |
| 4 | सहशिक्षक इंग्रजी | 01 | एम.ए.बी.एड / एम.एड. बी+ |
| 5 | सहशिक्षक गणित | 01 | एम.एस्सी.बी.एड / एम.एड. बी+ |
| 6 | सहशिक्षक विज्ञान | 01 | एम.एस्सी.बी.एड / एम.एड. बी+ |
| 7 | सहशिक्षक शा.शिक्षण | 01 | एम.ए.बी.पी.एड.बी+ |
| 8 | संगित शिक्षक | 01 | एम.ए.संगित बी + |
| 9 | संगणक शिक्षक | 01 | एम.एस्सी. (संगणक) |
| 10 | ग्रंथपाल | 01 | बी. लीब. / एम.लीब. |
| 11 | लिपिक | 01 | पदवीधर, एम.एस.सी.आय.टी |

वरील रिक्त पदापैकी शासन निर्णयानुसार संवर्गासाठी आरक्षित राहतील. तरी पात्रता धारक इच्छूक उमेदवारानी शैक्षणिक कागदपत्रे व पासपोर्ट आकाराच्या फोटोसह,दि.29/06/2025 रोज रविवार स.11.00 वाजता मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे.

**मुलाखत स्थळ**:- अध्यापक विद्यालय मांजरम ता.नायगाव जि.नांदेड

सचिव

## रविनगर सहाकारी गृहनिर्माण संस्था म.कौठा ता.जि. नांदेड

नोंदणी क्र. एनएडी/एनएडी/एचएसजी / ९११/८२ दि.१६.१२.१९८२

## जाहीर प्रगटन

रविनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. मौजे कोठा ता.जि. नांदेड या संस्थेच्या भागधारक व प्लॉट नं. १४२ च्या धारक सभासद श्रीमती लक्ष्मिबाई प्र.गोविंद गुंडाळे ह्या आहेत. त्यांनी स्वतः धारण केलेला प्लॉट नं.१४२ हा १) श्री लक्ष्मण शिवाजी हिवरे २) श्री श्याम शिवाजी हिवरे यांच्या संयुक्त नावावर हस्तांतरीत करण्या करिता संस्थेत लेखी विनंती अर्ज केला आहे. त्यावर संस्थेच्या मा.संचालक मंडळाच्या सभेत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.

संस्थेतील प्लॉट नं.१४२ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १८० चौ.मी. असून चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. १४९, पश्चिमेस : प्लॉट नं. १४३, दक्षिणेस : रस्ता व उत्तरेस : प्लॉट नं. १४९ आहे.

वर नमुद चतु:सिमेच्या आतील प्लॉट उक्त माहीतीच्या आधारे हस्तांतरीत करणे बाबत कोणाचीही हितसंबंध सौदाचिठ्ठी, विक्रीपत्र, वहिवाट किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे आक्षेप / उजर असतील किंवा सदरील प्लॉट मध्ये काही हक्क संबंध असल्यास त्यांनी आपला आक्षेप / उजर हे प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासुन सात दिवसाच्या आत लेखी कागदपत्रासह संस्थेच्या कार्यालयात अथवा संस्थेच्या सचिवाकडे नोंदवावा / सादर करावा. मुदतीत आक्षेप / उत्तर नाही आल्यास सदरील प्लॉट हस्तांतरणास कोणाचाही कसलाही आक्षेप / उजर नाही असे समजले जाईल, व संस्थेचे संचालक मंडळ सदरील प्लॉटच्या हस्तांतरणाबाबत पुढील कार्यवाही करेल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. मुदतीनंतर आलेले आक्षेप / उजर संस्थेवर बंधनकारक राहणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

**सचिव**
**रविनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म.कौठा ता.जि.नांदेड**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अफरिन खानम एजाज खान पठाण यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-२५४ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -- जुना मालमत्ता नं.-एच-२२० नविन वार्ड नं.-१६ नविन मालमत्ता नं.-१३३२ अधिनियमा अंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर -३० चौ. फुट, लांबी पुर्व पश्चिम - ४० फुट चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नं १७३ व १७२, पश्चिम: ६ मी. रस्ता, दक्षिण : प्लॉट नंबर १६१, उत्तर :प्लॉट नंबर १६३ वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अफरिन खानम एजाज खान पठाण यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-२५४ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -- जुना मालमत्ता नं.-एच-२१९ नविन वार्ड नं.-१६ नविन मालमत्ता नं.-१३३१ अधिनियमा अंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर -३० चौ. फुट, लांबी पुर्व पश्चिम - ४० फुट चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नं १७३, पश्चिम: ६ मी. रस्ता, दक्षिण :६मीटर रस्ता, उत्तर :प्लॉट नंबर १६२ वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, शेख मुस्तफा शेख रहेमत अली यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-११७ जुना वार्ड नं.- ३ मधील प्लॉट नंबर -- जुना मालमत्ता नं.-१९८०/२०४ नविन वार्ड नं.-२ नविन मालमत्ता नं.-१११४/२०४ अधिनियमा अंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर -४० फुट, लांबी पुर्व पश्चिम - २५ फुट चुर्तसिमा पुर्वे -शेख खैसर, पश्चिम: प्लॉट नंबर ७७, दक्षिण : शेख मुमताज शेख हैदर, उत्तर :शेख अहेमद वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, इलियास खान महेबुबखान पठाण यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-३७५ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -१३ मालमत्ता नं.-सी-७०२ नविन वार्ड नं.-- नविन मालमत्ता नं.-५२२ साईज पुर्व पश्चिम - १२.१९ मी. दक्षिण उत्तर-९.१४ मी.,

चुर्तसिमा पुर्वे -१० फुट रस्ता, पश्चिम: प्लॉट नंबर ४, दक्षिण : प्लॉट नंबर १२, उत्तर :३० फुट रस्ता श्री धोंडोपंत दिंगाबर निलावार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे. तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, जितेंद्र जयवंतराव राठोड यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-२६७ जुना वार्ड नं.- ४ मधील प्लॉट नंबर -१८ मालमत्ता नं.-१०३७ नविन वार्ड नं.-१७ नविन मालमत्ता नं.-२० साईज पुर्व पश्चिम - १७.२६ मी. दक्षिण उत्तर-३.५ मी.,

चुर्तसिमा पुर्वे -२० फुट रस्ता, पश्चिम: रेल्वेची हद्द, दक्षिण : युसूफ हाजी हमीद, उत्तर :सविताबाई गोपिनाथराव सौ. गोदावरीबाई देवराव मंठयाळकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे.

तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अशोक बाबुराव कदम यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-५५४ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर -६० मालमत्ता नं.-२७६५ नविन वार्ड नं.-२ नविन मालमत्ता नं.-१३६७ साईज पुर्व पश्चिम - १२.१९ मी. दक्षिण उत्तर-९.१४ मी.,

चुर्तसिमा पुर्वे -२० फुट रस्ता, पश्चिम: बिंदू यांचे शेत, दक्षिण : प्लॉट नंबर ६१, उत्तर :प्लॉट नंबर ५१ श्री.गणेश माधवराव वरणे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे.

तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, संतोष उत्तमराव राठोड यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-- जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-बी-४४२ नविन वार्ड नं.-१६ नविन मालमत्ता नं.-१२२२ साईज पुर्व पश्चिम - - मी. दक्षिण उत्तर--मी., चुर्तसिमा पुर्वे -एरिकेशन कॉलनी, पश्चिम: रस्ता, दक्षिण : श्रीमती ललीता उत्तम, उत्तर :सदरील जागेपैकी विक्री करण्याची जागा श्री. सुरेश गंगाधर श्रीरामवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे. तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, प्रदीप निरंजनराव बच्चेवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.--गट.नं.--जुना वार्ड नं.-८ मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-०७४ नविन वार्ड नं.-१० नविन मालमत्ता नं.-४४५ साईज पुर्व पश्चिम - ६० फुट. दक्षिण उत्तर-१०.८ फुट., चुर्तसिमा पुर्वे - दत्तात्र्य यादवराव, पश्चिम: रस्ता, दक्षिण : लक्ष्मण संभाजी, उत्तर :गोविंद संभाजी श्री. निरंजन संभाजी बच्चेवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे. तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

**स्थलांतर**

सिटी मॅक्स डिजिटल कलर

मो.7058766021,9422185282

गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## रस्ता सुरक्षा पथकाने तळीरामांना पुन्हा घडविली अद्दल






**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर रस्ता सुरक्षा पथक व दामिनी पथकाने संयुक्तरित्या कारवाई करीत सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे व बेशिस्त वाहनधारकांना शनिवारी (दि.२१) चांगलीच अद्दल घडविली आहे. ज्योती टॉकीज जवळ व विसावा गार्डन येथे प्रत्येकी पाच जण, गोपाळचावडी परिसर, खडकपूरा परिसर व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परीसर, कत्तलखाना परीसर इतवारा येथे प्रत्येकी दोन इसम तर गुंडेगावकर पेट्रोलपंपा जवळ एकास ताब्यात घेऊन त्यांच्यावर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच तीन वाहनधारकांवर म ो. वा. कायदा प्रमाणे कारवाई करून २५०० रूपयाचा दंड आकारण्यात आला आहे.

नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख सपोनि भागवत नागरगोजे व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दिनांक २१ जून रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकाने ज्योती टॉकीज जवळ ५ इसमांना दारू पितांना ताब्यात घेवून कारवाई करण्यात आली. तसेच दामिनी पथकाने विसावा गार्डन येथे ५ इसमांवर सार्वजनिक शांततेचा भंग केल्याबद्दल कारवाई करण्यात केली. तसेच ३ वाहनधारकांवर कारवाई करून २५०० रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पथकाने गोपाळची वाडी परिसरात दोघांना मद्यप्राशन करतांना ताब्यात घेवून त्यांच्या कारवाई केली. वजिराबाद पोलीस स्टेशनच्या पथकाने खडकपूरा परिसर व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परीसरात दारू पितांना दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कारवाई केली.

भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या पथकाने पेट्रोलिंग दरम्यान अशोक नगर परीसरात मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या चौघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कारवाई केली. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले. इतवारी पोलीस स्टेशनच्या पथकाने पेट्रोलींग दरम्यान इतवारा परिसरातील कत्तलखाना दारू पिऊन शांतता भंग करणाऱ्या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कारवाई केली. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्सची तपासणी करण्यात आली.

विमानतळ पोलीस स्टेशनच्या सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान गुंडेगावकर पेट्रोलपंपा जवळ १ इसम मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आला. त्यांच्यावर कलम ११०/११७ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

## शिवाजीनगर औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांचा प्रश्न लागणारा मार्गी

### आ. कल्याणकर यांच्या प्रयत्नातून ८ कोटींचा निधी मंजूर

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या म ध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शिवाजीनगर येथील औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्ते विकासाचा प्रश्न आता मार्गी लागणार असून आपल्या सततच्या पाठपुराव्यामुळे ८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या विकास कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती आ. बालाजी कल्याणकर यांनी दिली आहे.

नांदेड उत्तर विधानसभा म तदारसंघातील रस्ते विकासाच्या काम ाला प्राधान्य देणारे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी नांदेड शहरातील शिवाजीनगर येथील स्व. राम गोपाल गुप्ता को–ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल स्टेट म धील रस्ते विकासासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि संबंधित विभागाच्या खात्याकडे ही त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. अखेर रस्ते विकासासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करण्यात आली असून औद्योगिक वसाहत शिवाजी नगरने त्यांचा २५ टक्के सहभागाचा हिस्सा भरला आहे. त्यामुळे लवकरच या विकास कामाला सुरुवात होईल असा विश्वास आ. कल्याणकर यांनी व्यक्त केला आहे.

नांदेड शहराच्या विकासासाठी दूरदृष्टीकोण ठेवून आ. कल्याणकर यांनी यापूर्वी सुद्धा आयटीआय ते शिवाजीनगर दादराकडे जाणाऱ्या रस्त्याला पर्यायी रस्ता म्हणून आयटीआय पेट्रोल पंपापासून ते शिवाजीनगर ज्योती टॉकीज पर्यंत रस्ता काढला आणि आता शिवाजीनगर औद्योगिक वसाहत अंतर्गत सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटचे होणार त्यामुळे शिवाजीनगर वसाहतीतून सगळीकडे जाणारा शॉर्टकट रस्ता निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

## महापालिकेच्यावतीने डॉ. सुरेश सावंत यांचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी) –** येथील महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ. सुरेश सावंत यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंग संधू, सहायक आयुक्त गुलाम सादेक, मनपा शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी, रमेश चौरे यांची उपस्थिती होती.



महापालिकेच्या वतीने आपला सन्मान करतांना आम्हाला सार्थ अभिमान आणि आनंद झाला आहे अशी भावना आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी डॉ. सुरेश सावंत यांच्याशी त्यांच्या वाङ्मयीन वाटचालीबद्दल मनम ोकळेपणाने चर्चा केली. डॉ. सुरेश सावंत यांनीही महापालिकेच्या वतीने आपला सन्मान होणं, हा निश्चितच आनंद देणारा क्षण आहे अशी भावना व्यक्त केली.

## नांदेड परिक्षेत्रात पुन्हा हातभट्टीविरोधी धाडसत्र

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रात हातभट्टीची दारू व रसायनाचा नाश, त्याचप्रमाणे अवैध दारूची वाहतूक व विक्री रोखण्यासाठी दि. २२ जून रोजी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत एकाच वेळी मासरेड करण्यात आला. सदर कारवाईत परिक्षेत्रातील १६८ अधिकारी व ५४६ अंमलदार सहभागी झाले होते. चारही जिल्ह्यांनी केलेल्या मासरेड दरम्यान एकूण १५८ केसेस नोंदविण्यात आल्या असून ६ लाख ५ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

नांदेड परिक्षेत्रातील अवैध दारुच्या निर्मूलनासाठी पोलिसांनी आयोजित केलेली ही तिसरी मासरेड होती. परिक्षेत्रातील, नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या चारही जिल्ह्यांत मासरेड दरम्यान, संबंधित घटकांनी केलेली कार्यवाही खालील प्रमाणे :

नांदेड जिल्ह्यात दारूबंदीच्या ६६ केसेस करण्यात आल्या. त्यात हातभटटी दारु ८०२ लिटर, दारुचे रसायन २३६० लिटर, देशी दारु ११५९ बॉटल, विदेशी दारु ८३ बॉटल, सिंदी ५९५ लिटर असा २५, ७९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत ५६ अधिकारी, २२५ अंमलदारांनी सहभाग घेतला.

परभणी जिल्ह्यात ३७ केसेस करण्यात आल्या. त्यात हातभटटी दारु ९५ लिटर, दारुचे रसायन ३९५ लिटर, देशी दारु ४४७ बॉटल असा ६६, ८१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले. या कारवाईत ५२ अधिकारी व ११० अंमलदारांनी सहभाग घेतला.



हिंगोली जिल्ह्यात १५ केसेस करून १५ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. यात हातभटटी दारु १९४ लिटर, दारुचे रसायन ५० लिटर, देशी दारु २५४ बॉटल असा ८४ हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत ३५ अधिकारी व ९० अंमलदारांनी सहभाग घेतला.

लातूर जिल्ह्यात ४० केसेस करण्यात आल्या. यात हातभटटी दारु १०८० लिटर, दारुचे रसायन ११०० लिटर, देशी दारु ४६८ बॉटल असा दोन लाख २७ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी, संबंधित पोलिसांना देऊन, पोलिसांच्या सदर मोहिम ेस हातभार लावावा, असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील नागरिकांना केले आहे.

## दरोड्यातील फरार असलेले दोन आरोपी खंजरसह स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोड्यासारखा गंभीर गुन्हा करून फरार असलेल्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून खंजर आणि आदी मुद्देमाल जप्त करून शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराव यांच्या आदेशावरून पोलीस उपनिरीक्षक मिलींद सोनकांबळे व पथकाने जिल्ह्यामध्ये पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या दरोड्याच्या गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध सुरु केला. त्यात पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड गुर.नं. ४८३/२०२५ कलम ३०९(४),३ (५) भारतीय न्याय संहिता २०२३ या दरोडा गुन्ह्यातील आरोपी सोहेल खॉन ऊर्फ चिद्दी फेरोजसॉन पठाण (वय २४ वर्षे व्यवसाय मजूरी रा. बालाजी नगर हिंगोली नाका, नांदेड) यास मराठा हॉटेल सम ोरुन खंजरसह अटक करण्यात आली.

आरोपीस शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देवून आरोपीच्या ताब्यात असलेला अवैध शस्त्र संबंधाने पोलीस स्टेशन शिवाजीनगर नांदेड येथे प्रशस्त अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मासरेडमध्ये गोकुळ नगर येथील गंगा किराणा दुकाना सम ोर एक इसम देशी दारुची चोरटी विक्री करीत असल्याचे पोलीस उप निरीक्षक मिलींद सोनकांबळे यांना व त्यांच्या टिमला गोपनीय माहिती मिळाली. त्यावून सदर ठिकाणावरून देशी दारु विक्रेत्यास अटक केली. त्याच्याकडून देशी दारुच्या पाच बॉक्स जप्त करण्यात आले. आरोपीस शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या तिन्ही प्रकरणातील आरोपीस शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधीन करून या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रामराव बुटले यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** लोणी बु. येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव सदाशिवराव बुटले लोणकर (वय ८२) यांचे दि.२२ रोजी सायंकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी दि.२३ रोजी दुपारी १ वाजता लोणी बु. येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. रामराव बुटले यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच महेश बुटले व प्रा. संतोष बुटले यांचे ते वडील होत.

## नांदेड शहरातील बोरबन फॅक्टरी भागात व्यापाऱ्यावर खुनी हल्ला; दोघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** उसणे घेतलेले ५ लाख रुपये मागण्यासाठी आलेल्या दोघांनी व्यापाऱ्यास बेदम मारहाण करीत गंभीर जखमी करून खुनाचा प्रयत्न केला. ही घटना २० जून रोजी सकाळी साडेदहाच्या सुम ारास शहरातील बोरबन परिसरात घडली.




शहरातील वजिराबाद भागातील व्यापारी प्रवीण विश्वनाथ बेहरे यांनी बोरबन भागातील रहिवासी अनिल मालीवाल व गोविंद मालीवाल यांच्याकडून ५ लाख रुपये उसणे घेतले होते. २० जून रोजी अनिल मालीवाल व गोविंद मालीवाल हे दोघेजण ५ लाख रुपये मागण्यासाठी प्रवीण बेहरे यांच्याकडे २० जून रोजी सकाळी आले होते. त्यानंतर त्यांच्यात वादावादी झाली. वादाचे रूपांतर मारहाणीत होऊन या दोघांनी व्यापारी प्रवीण बेहेरे यांना बेदम मारहाण केली. त्यात ते गंभीर जखमी झाले. वाद सोडवण्यासाठी गेलेल्या साक्षीदारांना सुद्धा या दोन आरोपींनी मारहाण करून जीवे म ारण्याची धमकी दिली. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चिमा बोइने हे अधिक तपास करत आहेत.


**पान १ वरून...**


### जिल्ह्यात तीन आगीच्या....

हॉस्पिटल पिवळी गिरणी रोडजवळ एका चारचाकी वाहनाला आग लागली. या आगीत चारचाकी वाहनाचे मोठे नुकसान झाले. सदर आग अग्नीशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी आटोक्यात आणली. या तिन्ही आगीच्या घटनांवर अग्नीशन दलाचे अधिकारी के. एस. दासरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, गायकवाड, सावळे, साजिद, लांडगे, पवळे, किरकन, खंदारे, शिंदे, वाहन चालक नरवाडे, तोटावर, टारपे यांनी नियंत्रण मिळविले.

### शिवसेना ठाकरे गटाचे...

यांच्यासह आदी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, भुजंग पाटील, ज्योतिबा खराटे, खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी अभिनंदन केले. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये जिल्हा परिषद, महापालिका, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायती या निवडणुकांसाठी या नूतन पदाधिकाऱ्यांनी चांगले काम करून येणाऱ्या निवडणुकीत उबाठा शिवसेनेला घवघवीत यश मिळवून द्यावे अशी वरिष्ठ नेत्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## आ. चिखलीकरांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी) –** देगलूर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष तथा माजी नगरसेवक अंकुश देसाई देगांवकर, महिला तालुका अध्यक्षा तारकेश्वरी गुलाब पाटील, युवक तालुकाध्यक्ष शशांक पाटील मुजळगेकर, देगलूर मार्केट कमिटीचे माजी संचालक अच्युत पाटील, माजी पंचायत समिती सदस्य रमेश शिवणीकर, भगवानराव जाळगे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीचे नेते आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात प्रवेश केला.

अंकुश देसाई यांचा हा पक्षप्रवेश सोहळा रविवारी सकाळी आ. चिखलीकर यांच्या वसंतनगर येथील जनसंपर्क कार्यालयात संपन्न झाला. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगांवकर व जिल्हाध्यक्ष दिलीपराव




धर्माधिकारी, माजी आमदार अविनाश घाटे, ओमप्रकाश पोकर्णा, मोहन हंबर्डे, दिव्यांग सेलचे प्रदेशाध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर, व्यंकटराव पाटील गोजेगांवकर, वसंत सुगावे, प्रविण पाटील चिखलीकर, अशोक पाटील मुगांवकर, शिवराज पाटील होटाळकर, देगलूर राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राहूल देसाई देगांवकर, संतोष सावकार नारलावार, बाबु पाटील आलूरकर, दिगंबर कौरवार, अनिकेत पाटील राजूरकर, अशोक कांबळे, स्वप्नील इंगळे, मनोहर पाटील भोसीकर, नानवटे आदिंची उपस्थिती होती.

आ. चिखलीकर यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेसची दस्ती टाकून अंकुश देसाई यांचा राष्ट्रवादीत पक्षप्रवेश करण्यात आला. यावेळी आपले म नोगत व्यक्त करताना देसाई म्हणाले, गेल्या दहा वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा तालुकाध्यक्ष म्हणून काम केले आहे. पण शरद पवार पक्षात जिल्हास्तरावर सक्षम नेतृत्व शिल्लक राहिले नाही. आमच्यासारखे कार्यकर्ते राजकीयदृष्ट्या बेवारस झाले आहेत. त्यामुळेच आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आज मी असंख्य सहकाऱ्यांसह अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करीत आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती, देगलूर नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडविण्यासाठी आम्ही सर्वजण जिवाचे रान करुन विजयश्री खेचून आणू, साहेब तुमचा आशिर्वाद देगलूर तालुक्यावर कायम ठेवा, आगामी काळात देगलूर तालुका राष्ट्रवादीमय केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास अंकुश देसाई यांनी यावेळी व्यक्त केला.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले, जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची घोडदौड जोमाने सुरु आहे. देगलूर शहरासह ग्रामीण भागातील लोकांची नाळ जुळलेला नेता देगलूर राष्ट्रवादीला लाभला आहे. आमच्या राष्ट्रवादीत काम करणाऱ्यांना योग्य संधी दिली जाते. आमच्याकडे नवा–जुना असा भेदभाव होणार नाही.

देगलूर तालुक्यात पक्ष सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात करुन तालुक्यातील पाचही जिल्हा परिषद सर्कल व नगर पालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही. मी नेता नसून तुमचा कार्यकर्ता आहे. आपण सगळ्यांनी मिळून देगलूरसह जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस नंबर एकचा पक्ष करुन दाखवू, लवकरच अजित पवार यांना पुन्हा एकदा नांदेड जिल्ह्यात येण्याची विनंती करणार आहे. अंकुश देसाई यांच्यासोबत पक्षप्रवेश केलेल्या सहकाऱ्यांना जाहिर वचन देतो, तुम्ही काळजी करु नका, मी सदैव तुमच्या पाठिशी उभा आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com